रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २५० । पृष्ठे ८ ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹

अलिबाग-रोहा मार्गावरील नियोजनशून्य कामाची

# विद्यार्थ्यांना शिक्षा




- विद्यार्थ्यांची केंद्रावर पोहोचण्यासाठी पायपीट
- प्रशासनाचा बेजबाबदार कारभार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गेल्या महिनाभरापासून अलिबाग-रोहा रस्त्याच्या नूतनीकरण आणि रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात या कामामुळे नागरिकांचे हाल आणि विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. विशेषतः सोमवारी (दि.१६) बारावीच्या परीक्षेच्या काळात वाहतूक नियोजनाचा पूर्णपणे अभाव असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी अक्षरशः झुंज द्यावी लागली. सहाणगोठी ते सहाण बायपास आणि आरसीएफ कॉलनी कुरुळ गेट ते कुरुळ वळण दरम्यान सुरू असलेल्या कामामुळे सकाळपासूनच वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. सकाळी अकरा वाजता बारावीचा पेपर होता. मात्र कोणतीही पूर्वकल्पना नसल्यामुळे पालक विद्यार्थ्यांना रोजच्या वेळेप्रमाणे घेऊन निघाले. परिणामी, अनेक विद्यार्थ्यांना रस्त्यात अडकून बसावे लागले. यावेही काही विद्यार्थ्यांनी पायपीट करीत परीक्षा केंद्र गाठले, तर काही उशिरा पोहोचले. त्यामुळे प्रशासन आणि कंत्राटदाराच्या असमन्वयाबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

अलिबाग-रोहा मार्ग गेले कित्येक वर्षांपासून वादाचा विषय ठरला आहे. अलिबाग-रोहा मार्गावरील ८६ किलोमीटरच्या रस्त्याचे काम मंजूर होऊन सहा वर्षे उलटून गेली. •➤ पान २ वर



**नागरिक आणि पालकांकडून चौकशीची मागणी**

- रस्ते कामाचे नियोजन कोणी केले?
- वाहतूक व्यवस्थापन का करण्यात आले नाही?
- परीक्षा काळात काम थांबवण्याचा निर्णय का घेतला गेला नाही?
- जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?

**नियोजनशून्य काम तरीही; ठेकेदाराकडे दाम**

१२वीच्या परीक्षेसारख्या आयुष्य बदलणाऱ्या टप्प्यावर विद्यार्थ्यांना ट्रॅफिकमध्ये अडकवणारे नियोजन म्हणजे निष्काळजीपणाच नव्हे तर व्यवस्थेचे अपयश असल्याची टीका होत आहे. रस्ता पूर्ण होण्यापूर्वीच ठेकेदाराने १७७ कोटींपैकी १०६ कोटी रुपये खिशात घातले असल्याची माहिती यापुर्वीच माहितीच्या अधिकारातून समोर आली होती. रस्त्यांच्या दुरुस्तीला वेळ लागतो, नियोजन लागते, असं सांगणाऱ्या ठेकेदारांच्या फाईल मात्र वेगाने सरकतात, अशी बोचरी टीका स्थानिकांकडून करण्यात आली. १५ मिनिटांचा प्रवास दोन तासांचा होत असताना जबाबदार यंत्रणा मात्र 'काम सुरू आहे' या एका वाक्याच्या आड लपल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला.

## दादली पुलाखाली महिलेचा मृतदेह

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहराजवळील दादली पुलाखाली सावित्री नदीच्या पात्रात एक महिलेचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती. वैशाली विजय मांढरे असे या महिलेचे नाव असून त्या शिरगाव येथील रहिवासी आहेत. त्यांनी आत्महत्या केली असावी, अशी चर्चा घटनास्थळी होती. मिळालेल्या माहितीनुसार, समुद्राला भरती असल्याने सावित्री नदीची पाणीपातळी वाढल्याने वैशाली पांढरे यांचा मृतदेह पाण्यावर तरंगत •➤ पान २ वर

## लिपीक कर्मचाऱ्यांची निदर्शने



(छायाचित्र : समीर मालोदे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत असलेली तफावत दुर करुन सुधारित वेतन श्रेणी लागू करावी. तसेच, जशास तशी जुनी पेन्शन लागू करावी, या मागण्यांसह लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांसाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय व अधिकारी व कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. संघटनेच्यावतीने सोमवारी (दि.१६) रायगड जिल्हा परिषद कार्यालय परिसरात निदर्शने करण्यात आली.

लिपीक संवर्गाच्या कर्मचाऱ्यांना अनेक समस्या भेडसावत आहेत. आपल्या मागण्यांसाठी वेळोवेळी आंदोलन करूनही आश्वासनाच्या पलीकडे काहीही लागले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष धुमसत आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याच्या पूर्ततेसाठी जय महाराष्ट्र शासकीय •➤ पान २ वर






# ग्रामस्थांच्या बंधाऱ्यावर ‘गोदरेज’चा डोळा

## ● पाण्याचा वापर बिल्डिंग कन्स्ट्रक्शनसाठी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

पावसाळा संपताच अनेक ग्रामस्थ आपल्याजवळ असणाऱ्या पाळीव प्राण्यांची तहान भागवण्यासाठी बंधाऱ्याची निर्मिती करत असतात. हेच पाणी काही महिने आपल्या गुरांसाठी वरदान ठरत असते. मात्र, नावंढे येथे प्लॉट निर्मितीसाठी लागणारे पाणी हे या बंधाऱ्यामधून घेतले जात असल्यामुळे ग्रामस्थांमधून नाराजीची भावना व्यक्त होते.

खालापूर तालुक्यातील नावंढे ग्रामपंचायत हद्दीतील गोदरेज वूड कंपनीने १०१ एकर जमीन खरेदी केली आहे. याठिकाणी प्लॉटींगच्या माध्यमातुन बंगले बांधण्यात येत असताना, या कामासाठी पाण्याची खूप आवश्यकता भासत असते. मात्र, जवळच असलेल्या बंधारातून हे पाणी पंपाच्या साह्याने घेऊन या कामासाठी वापरण्यात येत आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थांचा गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या बंधाऱ्यातील पाणी गोदरेज प्रशासन सातत्याने वापरत असल्यामुळे हे पाणी लवकर संपुष्टात येईल व माणकिवली ग्रामपंचायत हद्दीत पाणीटंचाई निर्माण होईल. ही बाब माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य चंदन भारती यांच्या निदर्शनास येताच त्यांनी आक्रमक पवित्रा घेत कोणाला विचारून पाणी घेतले, असा प्रश्न संबंधित प्रशासनाला विचारला आहे.



> ग्रुप ग्रामपंचायत माणकिवली येथील बंधाऱ्याचे पाणी गोदरेज डेव्हलपमेंट बांधकामास वापरत आहे. तरी या पाण्याचा साठा कमी होत असून येणाऱ्या पुढील महिन्यात पाण्याचे दुष्काळ संभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्या या मनमानी कारभार करणाऱ्या कंपनी विरोधात व्यवस्थापनावर कारवाई करण्यासाठी प्रशासनाला निवेदन देण्यांत आले आहे.
>
> – बालकृष्ण वाघमारे, सरपंच, माणकिवली

# मुरूडमध्ये अवैध खैराची वाहतूक

## वनविभागाकडून दोन लाखाचा मुद्देमाल जप्त



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुडच्या वनविभागाकडून खैर तस्करी प्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली आहे. वनविभागाने तेलवडे आदिवासी भागात खैर लाकडाच्या २५ सोलीव नगांसह २ लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त करुन दोन जणांना ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुरूड तालुक्यातील तेलवडे गावाजवळील वनक्षेत्रात बेकायदेशीर सोलीव खैर लाकडाची तस्करी होत असल्याची माहिती मुरूड वनविभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे मुरुड वनविभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा पौळ व वनरक्षक हे बुधवारी (दि.११) रात्रीच्या सुमारास तेलवडे आदिवासी परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना राखाडी रंगाची इको कार अवैधरित्या खैराच्या सोलीव २५ नगांसह वाहतूक करीत असताना आढळून आली. या प्रकरणी वनविभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला असून, रमेश नारायण वाघमारे व राहुल रमेश वाघमारे यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच, या कारवाईत खैराचे २५ सोलीव नग, इको कार, मोबाईल व मुद्देमालासह एकूण २ लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी रोहा उपवनसंरक्षक व सहाय्यक वनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा पौळ, वनपाल राहुल कुलकर्णी, वनरक्षक विशाल ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

# शिरगाव चेकपोस्टजवळ गोमांस जप्त; दोघांवर गुन्हा

**। महाड । प्रतिनिधी ।**



महाड तालुक्यातील शिरगाव चेकपोस्ट परिसरात गोवंशीय मांसाची वाहतूक होत असल्याची माहिती महाड पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई करत सुमारे ६५ किलो मांस व एक चारचाकी वाहन जप्त केले असून दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. ही कारवाई रविवारी (दि.१५) करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जफर अब्दुल मज्जीद आणि शहेबाज अब्दुल्ला मुंडे यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून सुमारे १६ हजार २५० रुपये किंमतीचे अंदाजे ६५ किलो गोवंशीय मांस तसेच सुमारे १ लाख रुपये किंमतीचे वाहन असा एकूण १ लाख १६ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात संबंधित मांस विक्रीच्या उद्देशाने वाहनातून वाहतूक केली जात असल्याची माहिती समोर आली असून प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवराम खाडे हे करीत आहेत. महाशिवरात्रीच्या दिवशी घडलेल्या या संवेदनशील स्वरूपाच्या घटनेनंतर काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पोलीस कारवाईची माहिती मिळताच मोठ्या संख्येने गोरक्षक शिरगाव चेकपोस्ट नाक्यावर जमा झाले होते. दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी गोरक्षकांकडून करण्यात आली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही. या प्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाताळगंगा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

पातळगंगा येथील बिर्ला कार्बन इंडियाच्या सामजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महात्मा गांधी मेडिकल मिशनचे वैद्यकीय महाविद्यालय कामोठे यांच्या रक्तपेढीमध्ये हे रक्त जमा करण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन कंपनीचे युनिट हेड रवींद्र कुमार रघुवंशी तसेच मानव संसाधन विभाग प्रमुख निखिल भामरे, उत्पादन विभाग प्रमुख पुनिंदु कुमार व संदीप कुमार या मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी एकूण १२५ दानशूर रक्तदात्यांनी रक्तदान करून समाज्याप्रती उत्तरदायित्व दाखवले. हे रक्त थालेशिमियां पीडित बालकांसाठी वापरण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

# नरेंद्र मोदींचा मुंबई दौरा

- ■ गेट वे ऑफ इंडियाजवळ कार्यक्रम
- ■ दक्षिण मुंबईतील अनेक मार्ग बंद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी एक दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर येत असून मोदींच्या दौऱ्यानिमित्त मुंबईतील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. पंतप्रधान मंगळवारी (दि.१७) दुपारी २.१५ वाजता मुंबईत येणार आहेत. त्यानंतर, दुपारी २.३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्यात लोकभवन येथे द्विपक्षीय बैठक पार पडणार आहे. त्यानंतर, दुपारी ५ वाजता नरेंद्र मोदी आणि मॅक्रोन यांची हॉटेल ताज येथे विविध कंपन्यांच्या सीईओंसोबत राऊंडटेबल चर्चा होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुंबईतील वाहतुकीत बदल करण्यात आल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ६.३० वाजता मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया परिसरात इंडो-फ्रान्स सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी, व्हीव्हीआयपी नेतेमंडळींची उपस्थिती असणार आहे. त्या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईतील अनेक रस्ते वाहतूकीसाठी बंद राहणार आहेत. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे मंगळवारी भारत-फ्रान्स यांचा संयुक्त इंडिया-फ्रान्स इयर ऑफ इनोव्हेशन हा कार्यक्रम होणार आहे. याच पार्श्वभूमीवर वाहतूकीत बदल करण्यात आले आहेत. दक्षिण मुंबईतील अनेक रस्ते बंद करण्याची घोषणा करण्यात आली आहे. फ्रान्सच्या वाणिज्य दूतवासाच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून. १४ ते २२ फेब्रुवारीदरम्यान हा कार्यक्रम होत असून याची सुरुवात उद्या मंगळवार १७ फेब्रुवारी होणार आहे.

# खोपोलीत मंगळसुत्र चोरट्याला पकडले

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

काटरंग चौकात किरणा दुकाणासमोर शतपावली करणाऱ्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पळणाऱ्या दुचाकीस्वार भामट्यास नागरिकांनी पाठलाग करून पकडले. त्यातील मागे बसलेल्या मुस्सा अण्णू सय्यद इराणी उर्फ इराणी याने त्यांच्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकावून मोगवाडीच्या दिशेला पळाले होते. संतप्त नागरिकांनी भामट्यास बेदम चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

# पेणमधील वाघेश्वर मंदिराचे लोकार्पण

**। उरण । प्रतिनिधी ।**



पेण येथील कळवे (टेप) येथे श्री वाघेश्वर मंदिराचे लोकार्पण कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते रविवारी (दि.१५) पार पडले. यावेळी ते म्हणाले की, गेली तीस वर्षे वैभव पाटील माझे सहकारी आहेत. त्यांनी आपले वडील दिवंगत चंद्रकांत पाटील गुरुजी यांचे मंदिर बांधण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे. शिवशंकराचे देखणे आणि सुंदर मंदिर पाहून मला मनस्वी आनंद झाला आहे. येथील ग्रामस्थांसाठी आजचा दिवस आनंदाचा आहे. येत्या काळात येथे विकासाची गंगा येईल. तुमच्या जमिनी म्हणजे सरकारच्या दृष्टीने सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. त्यामुळे सरकारची वक्रदृष्टी लवकरच येथे पडेल. त्याबदल्यात तुम्हाला पैसे मिळतील, पण या पैशांमुळे नाती तोडू नका. माझे गाव शेलघर; परंतु १५-२० वर्षांच्या अथक प्रयत्नाने सिडकोच्या माध्यमातून सुनियोजित विकास केला आहे. लवकरच गावात आठ कोटींचे भव्यदिव्य मंदिर उभारत आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी हेवेदावे बाजूला ठेवावे लागतात. मी गावच्या विकासासाठी पुढाकार घेऊन तेच केले. वाघेश्वर मंदिराच्या रूपाने कळवे गाव नावारूपास येईल. या मंदिराच्या बांधणीत ज्यांनी ज्यांनी खारीचा वाटा उचलला आहे, त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो, असे ते म्हणाले.

# सिडकोचे ई-टॉयलेट वापराविना

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सिडकोच्या माध्यमातून कळंबोली वसाहतीत ७ ठिकाणी अत्याधुनिक ई-टॉयलेट बसवण्यात आले आहेत. २०१८ साली बसवण्यात आलेल्या या टॉयलेट करता जवळपास ४९ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. मात्र, या टॉयलेटच्या देखभाल आणि दुरुस्तीकडे सिडको प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे हे ई-टॉयलेट धूळ खात पडून आहे. तसेच, पालिका प्रशासनाने या टॉयलेटची जवाबदारी घेऊन लोकांच्या सेवेत हे टॉयलेट उपलब्ध करून देण्याची मागणी केली जात आहे. उघड्यावर केल्या जाणाऱ्या शौचामुळे होणारी दुर्गंधी टाळण्यासाठी आणि प्रदूषणामुळे सर्वांचे आरोग्य सुरक्षित रहावे यासाठीच ‘एक रुपयाचे क्वाईन टाका व अत्याधुनिक अशा ई-टॉयलेटचा वापर करा’ या तत्वावर सिडकोच्यावतीने कळंबोली वसाहतीत वसाहतीत ७ ठिकाणी जवळपास ५० लाख रुपये खर्चून सिडकोने इ-टॉयलेट बनवले आहेत.

पान १ वरून

## विद्यार्थ्यांना शिक्षा

मात्र, आजही अलिबाग-रोहा मार्गावरील प्रवाशांचा प्रवास खड्ड्यांतूनच होत आहे. अलिबागपासून रोहा त्यानंतर माणगावमधील साईपर्यंतच्या रस्त्यासाठी १७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र, जनतेला धुळीत ढकलून सत्ताधाऱ्यांनी केवळ स्वतःच्या फायद्यासाठी या रस्त्याचा वापर केला आहे. या रस्त्याचे काम करीत असताना रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी वाहतूक पोलिसांशी समन्वय साधणे ही कंत्राटदाराची मूलभूत जबाबदारी होती. मात्र, या प्रकरणात वाहतूक व्यवस्थापन पूर्णपणे कोलमडलेले दिसले. त्यामुळे कामाची गुणवत्ता सांगणाऱ्यांनी आधी नियोजनाची गुणवत्ता दाखवावी, असा सवाल पालकवर्गातून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू असताना तरी वाहतूक सुरळीत ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करावी आणि रस्ते कामाचे वेळापत्रक तात्पुरते बदलावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा प्रश्न असताना नियोजनशून्य कामे करून प्रशासन आणि कंत्राटदार नेमका कोणाचा विकास करत आहेत, असा संतप्त सवाल आता उघडपणे विचारला जाऊ लागला आहे.

**प्रवास १५ मिनिटांचा, शिक्षा २ तासांची**

रस्ते नूतनीकरणाच्या नावाखाली सुरू असलेले काम जनतेसाठी डोकेदुखी ठरत आहे. १५ मिनिटांचा प्रवास दोन तासांचा होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. सकाळी आणि संध्याकाळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून प्रवाशांना प्रचंड विलंब सहन करावा लागत आहे. विशेषतः बारावीच्या परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांना वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका बसल्याचा आरोप होत आहे. काही विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र गाठण्यासाठी धावपळ करावी लागली, तर काहींना पायपीट करावी लागल्याचे सांगितले जात आहे. परीक्षा काळात तरी कामाचे वेळापत्रक बदलणे, वाहतूक पोलिसांशी समन्वय साधणे आणि पर्यायी मार्ग खुले ठेवणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात या गोष्टींकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

## लिपीक कर्मचाऱ्यांची निदर्शने

निमशासकीय व अधिकारी व कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे.संघटनेच्यावतीने जिल्हा परिषद परिसरात निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात संघटनेचे रायगड जिल्हा पालक अध्यक्ष सचिन पाटील, संघटनेचे रायगड जिल्हा परिषद युनिट अध्यक्ष मंगेश ठाकूर, सचिव प्रशांत जुईकर, कोषाध्यक्ष अमोल म्हात्रे, प्रसिद्धी प्रमुख विजय कासार यांच्यासह लिपीक संवर्गाच्या कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## दादली पुलाखाली महिलेचा मृतदेह

असलेला वाटसरूंच्या निदर्शनास आला. याबाबत त्यांनी तात्काळ महाड शहर पोलीस ठाण्यात कळविले असता पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. महाड पोलीस पुढील तपास करीत असून वैशाली मांढरे यांचा मृतदेह महाड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आला आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आग

**। रायगड । प्रतिनिधी ।**



अलिबाग येथील रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील हॉटेल स्वामी छाया येथे सोमवारी (दि.१६) सायंकाळच्या सुमारास विजेच्या शॉर्ट सर्किटने आग लागल्याची घटना घडली. या आगीमध्ये हॉटेलमधील सामानाचे नुकसान झाले आहे. आग लागल्याचे समजताच अलिबाग नगरपरिषदेचा अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहचून आग आटोक्यात आणली. तसेच, हॉटेलमध्ये असणारे सामान आणि गॅस सिलिंडर तातडीने बाहेर काढण्यात अग्निशमन दलाला यश मिळाले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. रात्री उशिरापर्यंत आग कुठून लागली, याचा शोध घेऊन तेथे पाण्याचा मारा करण्यात येत होता. घटनास्थळी अलिबागमधील नागरिकांनी गर्दी केली होती. अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे आणि त्यांची यंत्रणादेखील पोहोचली होती. अलिबाग नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी देखील घटनास्थळी भेट देत हॉटेल मालकांची विचारपूस करून यंत्रणांना पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत.

# २३ फेब्रुवारीपासून विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधिमंडळ यांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ फेब्रुवारीपासून मुंबईत सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि.१६) विधानभवनात संसदीय कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत विधानसभा आणि विधानपरिषदेचे कामकाज निश्चित करण्यात आले. अधिवेशन काळात होळी, गुढीपाडवा अशा सुट्ट्या येत असल्याने अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात म्हणजे शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी दोन्ही सभागृहाचे कामकाज सुरू राहणार आहे.

विधिमंडळ यांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला १ ते ३ मार्च दरम्यान होळीची सुट्टी देण्यात आली आहे. त्यानंतर १९ मार्च (गुढीपाडवा), २० मार्च (शुक्रवार), २१ मार्च (शनिवार) आणि २२ मार्च (रविवार) असे सलग चार दिवस सभागृहाचे कामकाज बंद ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर तीन दिवसांनी म्हणजे २५ मार्च रोजी अधिवेशन संस्थगित केले जाईल. तसेच, राज्याचा अर्थसंकल्प ६ मार्चला सादर होणार असल्याचे देखील या बैठकीत सांगण्यात आले. या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील आदी उपस्थित होते.

# दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**



म्हसळा तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल खरसई येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाला. शाळा समितीचे अध्यक्ष रामचंद्र मांदारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देताना नितीन पाटील यांनी विद्यार्थ्यांना भावी जीवनात सतर्क राहण्याचे आवाहन केले. तसेच, दिवसेंदिवस स्पर्धा वाढत असून विद्यार्थ्यांनी आपले यशस्वी करिअर घडवणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. तसेच, दहावी हि जीवन घडविण्याची गुरुकिल्ली असल्याचे सांगून सर्व विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या निरोप समारंभ कार्यक्रमास आगरी समाज अध्यक्ष कानू शीतकर, जनार्दन खोत, विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन पाटील, सेवानिवृत्त शिक्षक सातपुते, न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक देवगावकर, भाटकर, जयसिंग बेटकर, स्नेहा बेडके, अथोत्या भांजी, पालक, शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.

# रोहित पवारांच्या पोस्टने खळबळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आमदार रोहित पवार यांनी त्यांचे काका अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. अजित पवार यांच्या अपघाताला २० दिवस पूर्ण झाले आहेत; परंतु, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून अद्याप प्राथमिक चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला नाही. या दिरंगाईमुळे रोहित पवार यांनी संशय व्यक्त करत प्रशासनावर जोरदार टीका केली आहे.

रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, स्व.दादांच्या दुर्दैवी अपघाताचा आज विसावा दिवस असून अद्यापही डीजीसीएकडून प्राथमिक चौकशी अहवाल आलेला नाही. तसेच, सर्व नियमांचे उल्लंघन करत विमाने चालवणाऱ्या कंपनीविरोधात देखील काहीही कारवाई अद्यापर्यंत झालेली नाही. परिणामी शंका अधिक बळावत चालल्या आहेत. त्यामुळे डीजीसीएने लवकरात लवकर प्राथमिक चौकशी अहवाल द्यावा तसेच व्हिसीआरवर योग्य ती कारवाई करावी, असेही रोहित पवार म्हणाले.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to all that **MR. RAJESH CHANDRAKANT MANDE** is the owner of Agricultural Land, more particularly described in the Schedule written hereunder (“**said Property**”).

Any person/s having any claim/s in respect of the said Property any part thereof by way of sale, inheritance, exchange, mortgage, charge, lease, tenancy, license, lien, gift, trust, lis-pendens, maintenance, possession, easement, or otherwise howsoever is requested to make the same known to undersigned at address mentioned below, alongwith necessary documents to substantiate such claim/s, within **14 (Fourteen)** days, from the publication of this notice, failing which the claim/s, if any, of any person/s not lodged within said stipulated period shall be considered as wilfully abandoned, waived and given away by said person/s.

**The Schedule**
(The said Property)

All that piece and parcel of agricultural land admeasuring 8.36 Hector Aars bearing Survey No. 84, Gat No. / Hissa No. 2 situate, lying and being at Mouje Beed Budruk, Taluka Karjat, Raigad.

Dated this 17th day of February, 2026

**Adv. Nitin Tabhane**
**Nexus Legal, *(Advocates)***
New Apollo Cooperative Housing Society Limited 14th Road, Khar (West), Mumbai 400052
email: nitin@nexuslegal.net.in
**Mob. No. 9823241851**

## निवडक



### रेवदंडा ज्येष्ठ नागरिक संघाचा वार्षिक उत्सव साजरा

**रेवदंडा** : राज्य व आतंराराज्य पुरस्कार प्राप्त रेवदंडा ज्येष्ठ नागारिक संघाचा २४ वा वार्षिक उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. रेवदंडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या विरंगुळा केंद्रात बुधवारी (दि.११ ) सायकांळच्या सुमारास आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सुरूवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली, त्यानंतर उपस्थित मान्यवराचे स्वागत ज्येष्ठ नागरिक रेवदंडा संस्थेचे अध्यक्ष सुभाष चिटणीस तसेच लता चिटणीस यांचे हस्ते श्रीफळ व पुष्पगुच्छ प्रदान करून करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांनी उपस्थितांना संबोधीत केले, तत्पुर्वी दिवंगत ज्येष्ठांना व मान्यवर व्यक्तीना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.



### धडाकेबाज कारवाईत स्वच्छता

**पनवेल** : महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर खांदा वसाहतीतील खांदेश्वर मंदिर येथे भरलेल्या जत्रेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. विविध व्यापाऱ्यांनी स्टॉल्स उभारल्याने परिसरात मोठी उलाढाल झाली. मात्र जत्रा आटोपल्यानंतर मंदिर परिसर, रस्ते व गार्डनमध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक, उष्टावस्तू व इतर कचरा साचला. यामुळे संपूर्ण भाग अस्वच्छ झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पनवेल महानगर पालिका प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवली. स्वच्छ आरोग्य अधिकारी अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ५० हून अधिक स्वच्छता दूतांनी पहाटेपासून काम सुरू केले. पाच ते सहा घंटागाड्या व दोन मोठ्या ट्रकच्या सहाय्याने तब्बल २५ टन कचरा गोळा करून डम्पिंग ग्राउंडवर हलविण्यात आला. अवघ्या एका तासात संपूर्ण परिसर पुन्हा स्वच्छ करण्यात यश आले.पालिकेच्या या तत्परतेचे नागरिकांकडून कौतुक होत असून, भविष्यात जत्रेनंतर स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांनीही जबाबदारी घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### रिक्षाचालकावर गुन्हा

**पनवेल** : रिक्षाने ज्येष्ठ नागरिकाला दिलेल्या धडकेत ७२ वर्षीय चिंतामण शंकर कांबळे हे जखमी झाले. अपघाताप्रकरणी रिक्षाचालकाविरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चिंतामण कांबळे (राहणार बोरले) हे मॉर्निंग वॉक करून शेडुंग सर्कल जवळ बस थांब्याजवळ पुणे लेनवर शेडंग या ठिकाणी आले असता मागून आलेल्या रिक्षाने त्यांना ठोकर दिली. अपघातात चिंतामण कांबळे हे रस्त्यावर पडले. त्यानंतर रिक्षाचालक मदत न करता पळून गेला. या अपघातात त्यांच्या कमरेला गंभीर दुखापत झाली.

### मोरबे येथे स्कुटीची चोरी

**पनवेल** : पनवेल जवळील मोरबे धरणाच्या बाजूला असलेल्या घरासमोरील स्कुटी चोरीला गेल्याप्रकरणी राम कातकरी (राहणार रोडपाली) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यश दाभोळकर हे डॉक्टर होमी भाभा रोड मुंबई या ठिकाणी राहतात. त्यांनी छोटा मोरबे डॅम भाडेतत्त्वावर घेतला आहे. त्या ठिकाणी ते मत्स्यपालन करतात. या ठिकाणी वापरण्यासाठी त्यांनी घराजवळच स्कुटी उभी केली होती. ती चोरीला गेली असून संशियत राम कातकरीही गायब असल्याने आणि त्याचा संपर्कही होत नसल्याचे आढळले.

### साईनगर येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल** : पनवेल शहरातील साईनगर परिसरातून एक २६ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना घडली असून याघटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आफरीन कच्छी असे या तरुणीचे नाव असून तिची उंची अंदाजे ५ फूट १ इंच, रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, बांधा मजबूत, अंगात काळ्या व पांढऱ्या रंगाची टॉप व प्लाझो पँट घातलेली असून त्यावर काळ्या रंगाचा बुरखा घातलेला आहे. सदर तरुणीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार एस.एस. कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधा.

### स्वामी समर्थ ग्रंथालयातर्फे काव्यवाचन

**अलिबाग** : स्वामी समर्थ सार्वजनिक ग्रंथालय चेंढरे व शब्द सखी वाचन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जल्लोष कवितांचा हा स्वरचित कविता वाचनाचा कार्यक्रम बुधवारी (दि.१८) श्री विठ्ठल मंदिर हॉल, जोगळेकर नाका, छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ दुपारी तीन ते पाच या वेळेत आयोजित केला आहे ऋतू व उत्सव नात्याचा या विषयावर स्वरचित कविता चे वाचन व सादरीकरण आहे. तरी रसिकांनी याचा आस्वाद घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

### उरण येथे श्री स्वामींच्या पादुकांचे आगमन

**उरण** : उरण येथील श्री स्वामी समर्थ मठ आनंद नगर ,उरण येथे रविवारी (दि.१५ ) रोजी सकाळी ८.३० ते १० वाजेपर्यंत श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचे आगमन प्राणप्रतिष्ठा सोहळा राज शेखर म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले, अशी माहिती श्री स्वामी समाज मंदिर अध्यक्ष शेखर द्वारकानाथ म्हात्रे यांनी दिली. कार्यक्रमात सकाळी अक्कलकोट येथून आणलेल्या श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचे अभिषेक करण्यात आले. शंकराच्या पिंडीवर अभिषेक, श्री स्वामी चा अभिषेक करण्यात आला.

# कोकणाला आले उत्सवाचे स्वरूप

| रायगड | प्रतिनिधी |

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर नवी मुंबई येथे आयोजित हिंद दी चादर या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दूरदृष्यप्रणालीव्दारे सविस्तर आढावा घेतला. या समागम कार्यक्रमासाठी कोकण सज्ज झाला आहे.

यावेळी डॉ. सूर्यवंशी यांनी सर्व यंत्रणांना सूचना दिल्या की, या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमाच्या आयोजनात कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी सर्व प्रकारे प्रचार प्रसिद्धी करावी. येणाऱ्या भाविकांची अंदाजित संख्या तपासावी आणि त्याप्रमाणे व्यवस्थेचे काटेकोर नियोजनही करावे.

- **हिंद-दी-चादर शहिदी समागम कार्यक्रम**
- **कोकण आयुक्तांनी घेतला आढावा**

या कार्यक्रमाच्या प्रचार प्रसिद्धीसाठी सर्व स्तरातून सर्व यंत्रणांनी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करावा. वेबसाईटचा जास्तीत जास्त वापर करावा. स्वच्छता मोहिमा राबवाव्यात. आरोग्य मेळावे घ्यावेत. ग्रामसभा घ्याव्यात. शाळांमधून पालकसभा घ्याव्यात. शाळा-महाविद्यालयांमधून चित्रफीत दाखवावी माहितीपट दाखवावेत अशा विविध माध्यमांमधून जास्तीत जास्त प्रमाणात प्रसारित करावे.

#### आरोग्य यंत्रणा सज्ज

ओवे मैदान, खारघर, नवी मुंबई येथे होणाऱ्या मुख्य सोहळ्यासाठी राज्यासह देशाच्या विविध भागांतून सुमारे १५ लाखांहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कोंकण विभागांतर्गत येणाऱ्या ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि मुंबई या जिल्ह्यांत दि. १० ते २५ फेब्रुवारी या कालावधीत अखंड मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या नियोजनात जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा सक्रिय सहभाग आहे.

#### आरोग्य शिबिरे

या कालावधीत दरम्यान गाव व वस्ती स्तरावर आयोजित विशेष वैद्यकीय शिबिरांना प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत १७६५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमधून एकूण ६५ हजार ९६ नागरिकांनी लाभ घेतला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक ५३२ शिबिरे आयोजित करण्यात आली असून, ठाणे जिल्ह्यात ४५७, पालघर जिल्ह्यात २४०, रायगड जिल्ह्यात ४२३ आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ११३ शिबिरे पार पडली आहेत. या शिबिरामधून ठाणे २७०७८, पालघर ९०३४, रायगड १४८८३, रत्नागिरी १९८१६, आणि सिंधुदुर्गमध्ये ४ २८५ नागरिकांनी लाभ घेतला.

#### ग्रामपंचायतीचा सहभाग

ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण २ हजार ९९८ ग्रामपंचायतींनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यासाठी या ग्रामपंचायतींमध्ये लाऊडस्पीकरद्वारे प्रसिद्धी करण्यात आली आहे. गावांच्या प्रवेशद्वारांवर आणि महत्त्वाच्या ठिकाणी एकूण २ हजाराहून अधिक जनजागृती बॅनर्स लावण्यात आले आहेत. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सर्व जिल्ह्यांमध्ये ग्रामपंचायत स्तरावर जनजागृती, ग्रामसभा, स्वच्छता मोहीम आणि प्रसिद्धी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

#### विद्यार्थ्यांचा सहभाग

आतापर्यंत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील एकूण १५ हजार ९७२ शैक्षणिक संस्थांनी विविध कार्यक्रमांत सहभाग नोंदविला असून, सुमारे २२ लाख ३८ हजार ९९० विद्यार्थ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतला आहे. शिक्षण विभागाच्या १४ फेब्रुवारी पर्यंतच्या अहवालानुसार, जिल्हा परिषद व अनुदानित प्राथमिक शाळा, खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये, तसेच आश्रमशाळा, निवासी शाळा आणि वसतिगृहे यामध्ये विविध स्पर्धा, व्याख्याने, निबंध लेखन, वक्तृत्व, चित्रकला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## आदिवासींना स्वत:च्या जमिनीत जाण्यास मज्जाव?

**मोठ्या आंदोलनाची भीम आर्मीची गर्जना; रस्ता परिषदेतून राज्यव्यापी लढ्याची घोषणा होणार**

| वावोशी | प्रतिनिधी |

डोणवत गावात आदिवासी शेतकऱ्यांच्या मालकी हक्काच्या शेतजमिनी असूनही अनेक वर्षांपासून त्यांना स्वतःच्या शेतीत जाण्यास अडथळे येत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. या संदर्भात शेतकऱ्यांनी नामवंत कंपनीच्या व्यवस्थापनाकडे वारंवार निवेदने दिली असली, तरी प्रश्न अद्याप निकाली न निघाल्याने संताप व्यक्त होत आहे.



देशातील शेतकरी स्वतःच्या जमिनीत जाण्यास वंचित राहणे ही अत्यंत दुर्दैवी व शोकांतिका असल्याची भावना व्यक्त करत भीम आर्मी संघटनेने अनेक आंदोलन व निवेदनांद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संघटनेने आता आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या चार-पाच दिवसांत शेतकऱ्यांना सोबत घेऊन कोकणात प्रथमच भव्य रस्ता परिषद आयोजित करण्यात येणार असून, त्यातून मोठ्या शेतकरी आंदोलनाची घोषणा केली जाणार आहे. या पत्रकार परिषदेला अशोक कांबळे, दीपक भालेराव, प्रितेश पवार उपस्थित राहणार असल्याची माहिती संघटनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश श्याम चव्हाण यांनी दिली. दरम्यान, या प्रकरणामुळे स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रस्तावित आंदोलनामुळे जिल्ह्यातील वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## हरिनामाच्या गजरात लोधिवली दुमदुमणार

| रसायनी | प्रतिनिधी |

लोधिवली नगरी पुन्हा एकदा हरिनामाच्या अखंड निनादाने दुमदुमणार आहे. हनुमान व विठ्ठलरखुमाई मंदिर परिसरात ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखंड हरिनाम उत्सव आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, तो श्रद्धा, संस्कार आणि सामुदायिक ऐक्याचा दिव्य उत्सव ठरणार आहे.

या भक्तिमय पर्वात दररोज पहाटे काकड आरतीने वातावरण प्रसन्न होईल. त्यानंतर हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, ओजस्वी प्रवचने, सुरेल भजने, जोशपूर्ण कीर्तन आणि हरिजागर यांची अखंड मालिकाच रंगणार आहे. संपूर्ण परिसर नामस्मरणाच्या तेजाने उजळून निघणार असून भाविकांना आत्मशुद्धी व अंतर्मुख होण्याची संधी लाभणार आहे. सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हरिनामाच्या अखंड गजरात न्हाऊन निघणारा हा भक्तीचा महासागर लोधिवलीसाठी एक अध्यात्मिक पर्व ठरणार आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा-२०२५

## जिल्हास्तरीय विजेत्या मंडळांचा केला गौरव

| रायगड | प्रतिनिधी |

सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा-२०२५ स्पर्धेत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक श्री युवा मित्र मंडळ, पनवेल, नवी मुंबई , तृतीय क्रमांक सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट, रोहा, रायगड यांचा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते गौरव व पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

ही स्पर्धा तीन स्तरांवर राबविण्यात आली होती. मंडळांची निवड करताना कला व संस्कृती पारंपरिक कलांचे आयोजन, दुर्मीळ वस्तूंचे प्रदर्शन, सामाजिक कार्य महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी राबविलेले उपक्रम पर्यावरण पूरक गणेशोत्सव, प्रदूषण विरहित परिसर, पर्यावरणपूरक मूर्ती आणि सजावट निसर्ग जतन गडकिल्ले संवर्धन आणि स्वच्छतेबाबत जनजागृती या प्रमुख निकषांचा विचार करण्यात आला.

## स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाची बैठक संपन्न

| पनवेल | प्रतिनिधी |

येत्या २० मार्च रोजी होणाऱ्या क्रांती दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या अभिवादन सभेच्या पूर्वतयारीची बैठक स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक महाड येथे घेण्यात आली.



या बैठकीला रायगड जिल्ह्याचे कार्याध्यक्ष विजय धोत्रे, रायगड जिल्हा संघटक राजेश हॉटे, माणगाव तालुका अध्यक्ष नितेश हाटे, श्रीवर्धन तालुका अध्यक्ष सुयोग लोखंडे, पेण तालुका अध्यक्ष अमित कांबळे, रोहा तालुका अध्यक्ष संतोष कवितकर, पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहराध्यक्ष प्रशांत सोनवणे, पेण तालुका अध्यक्ष अमित कांबळे, पनवेल तालुका संघटक मयूर गायकवाड महाड शहराचे अध्यक्ष सुनील जाधव महाड तालुका कार्यकारिणी व महाड शहर कार्यकारिणीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या अभिवादन सभेची संपूर्ण जबाबदारी ही महाड तालुका अध्यक्ष सुजित जाधव यांच्यावर सोपवण्यात आलेली आहे. या सभेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पक्षाचे अध्यक्ष सागर संसारे व महाराष्ट्र राज्य कमिटी व मुंबई कमिटीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. ही अभिवादन सभा यशस्वी करण्याकरता आवश्यक असलेले सहकार्य महेश साळुंखे व रायगड जिल्हा कार्यकारणी देणार आहे. या सभेसाठी जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना आणण्याची जबाबदारी अध्यक्षांवर सोपविण्यात आली आहे.

## श्रीवर्धनमध्ये सत्ताधाऱ्यांचा कारभार ठप्प

**आश्वासनांची फक्त आतषबाजी; विकासकामांचा बोजवारा उडाला**

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन नगरपालिकेची निवडणूक मोठ्या गाजावाजात पार पडली. प्रचारसभांमध्ये शहराचा कायापालट करू, विकासाचा नवा अध्याय सुरू करू, असे दमदार आश्वासन देणाऱ्या सत्ताधाऱ्यांना आता सत्तेचा महिना उलटून गेला तरी साधी स्थायी समितीही स्थापन करता आलेली नाही. त्यामुळे नगरपालिकेचा कारभार अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र आहे.

सत्तेसाठी एकत्र आलेल्या लोकप्रतिनिधींमध्ये अंतर्गत वाद, गटबाजी आणि खुर्चीसाठी सुरू असलेली चढाओढ यामुळे महत्त्वाचे निर्णय प्रलंबित राहिले आहेत. शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत प्रश्नांकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे.

निवडणुकीपूर्वी शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, पर्यटन विकास, फेरीवाल्यांचे पुनर्वसन, समुद्रकिनाऱ्यावरील अनधिकृत बांधकामे, वाहतूक कोंडी यावर ठोस उपाययोजना करण्याची ग्वाही देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती जैसे थेच आहे.

शहरातील अनेक रस्त्यांची अवस्था दयनीय, खड्ड्यांचे साम्राज्य, पावसाळ्यापूर्वी गटारसफाई अपुरी, भटक्या कुत्र्यांचा व मोकाट जनावरांचा वाढता त्रास, फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे बाजारपेठेत वाहतुकीची कोंडी, पर्यटन विकासासाठी कोणतीही ठोस कार्यवाही नाही. या सर्व गंभीर विषयांवर सत्ताधाऱ्यांकडून ठोस भूमिका दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

स्थायी समिती ही नगरपालिकेचा कणा मानली जाते. आर्थिक तरतुदी, विकासकामांना मंजुरी, निविदा प्रक्रिया यासाठी ही समिती अत्यावश्यक असते. मात्र सत्ताधाऱ्यांच्या अंतर्गत राजकारणामुळे तिची स्थापना रखडली आहे. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि काही नगरसेवक यांच्यातील कोण मोठे? या सत्तासंघर्षामुळे शहर विकासाचे काम थांबले आहे, अशी टीका विरोधकांनी केली आहे.

## बांधकामांच्या डेब्रीजचा विळखा



| पनवेल | प्रतिनिधी |

शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या बांधकामांमधील डेब्रीज मोकळ्या जागेत तसेच रहिवासी वस्तीजवळ टाकण्यात येत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सिमेंटची धूळ आणि बांधकामाचा कचरा वाऱ्यामुळे थेट घरांमध्ये येत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे.

विशेष म्हणजे हा प्रकार पनवेल महानगर पालिका हद्दीतच सुरू असून संबंधित ठेकेदारांवर कारवाई कधी होणार, असा सवाल नागरिक करत आहेत.

**बाह्यवळण मार्ग १५ वर्षांनंतरही मुहूर्ताविना** | **भाविक, पर्यटक अन स्थानिक नागरिक हवालदिल**

# पालीत वाहतूक कोंडीची समस्या बिकट

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

महाराष्ट्रातील प्रख्यात धार्मिक व अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात वाहतूक कोंडीची समस्या अत्यंत बिकट झाली आहे. मागील अनेक वर्षांपासून रखडलेला बाह्यवळण मार्ग अद्याप पूर्ण न झाल्याने भाविक, पर्यटक, प्रवासी आणि स्थानिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

अरुंद रस्त्यातून अवजड वाहने काढताना चालकांची मोठी कसरत होत असून, या कोंडीमुळे शहराचा श्वास गुदमरत आहे.



पाली हे तालुक्याचे ठिकाण असल्याने येथे नेहमीच वर्दळ असते. शहरातील बल्लाळेश्वर मंदिर परिसर, ग. बा. वडेर हायस्कूल, जुने एस.टी. स्टँड, गांधी चौक आणि बाजारपेठ यांसारख्या अरुंद रस्त्यांवर नियमित कोंडी होते. डबर व खडी वाहतूक करणारे अवजड डंपर, नियमांचे उल्लंघन करून होणारी दुहेरी वाहतूक आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेली अवैध पार्किंग यामुळे ही समस्या अधिकच जटील झाली आहे. अनेकदा महत्त्वाच्या ठिकाणी वाहतूक पोलीस तैनात नसल्याने कोंडीत भर पडते, ज्याचा फटका रुग्णवाहिकांनाही बसत आहे.

> **“सर्व मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन तसेच सर्व तांत्रिक अडचणी सोडवून बाह्यवळण मार्ग केल्यास पालीतील वाहतूक कोंडी कमी होईल. वाहन चालकांनी देखील नियमांचे पालन करावे.**
> **सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष”**

> **“पोलिसांनी योग्य प्रकारे वाहतुकीचे नियोजन करणे आवश्यक आहे.स्त्यावर आलेली अनधिकृत बांधकामे तोडली पाहिजेत. बाह्यवळण मार्ग झाल्यास वाहने थेट बाहेरून जातील आणि वाहतूक कोंडीचा प्रश्न आपोआप मार्गी लागेल.**
> **कपिल पाटील,पाली”**

#### केवळ वनवास

**पालीतील कोंडीवर रामबाण असणाऱ्या बाह्यवळण मार्गाला १५ वर्षे उलटली आहेत. वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गाला पाली-पाटणूस मार्गाशी जोडणारा हा रस्ता बलाप गावावरून थेट बल्लाळेश्वर मंदिराच्या पाठीमागे झाप गावापर्यंत जाणार आहे. यासाठी १८ कोटी रुपये रस्त्यासाठी आणि १० कोटी रुपये भूसंपादनासाठी मंजूर आहेत. तांत्रिक अडचणींमुळे आणि जमिनीचा मोबदला योग्य न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या विरोधाने हे काम अद्याप कागदावरच आहे.**

# पुरींना कोण हाकलणार?

केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांना तात्काळ हाकलायला हवे. ते अर्थातच नरेंद्र मोदी यांनी करायला हवे. पण मुळात पुरी जे काही करीत होते तेच मुळी मोदींसाठी होते असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणजे पुरींना दोषी मानायचे झाले तर मोदींना किमान दिलगिरी तरी व्यक्त करावी लागेल. ते तर मोदींना कधीही शक्य नाही. हा सर्व अमेरिकेतल्या एपस्टीन फाइल्सचा विषय आहे. एपस्टीन नावाच्या लिंगपिसाट इसमाने बडे राजकारणी, उद्योगपती, राजदूत इत्यादींना लहान मुली, बायका पुरवून त्यांच्याकरवी आपले काम काढून घेतले असा आरोप आहे. यातूनच त्याने आपले प्रचंड आर्थिक साम्राज्य उभारले आणि कित्येक वर्षे पोलिस त्याला हात लावू शकले नव्हते. अखेर २००८ मध्ये न्यायालयापुढे त्याने गुन्हा कबूल केला व त्याला सुमारे दीड वर्षे तुरुंगवास झाला. त्यानंतर बाहेर आल्यावर पुन्हा त्याचे धंदे चालू झाले. हरदीप पुरी आणि इतरांचा त्याच्याशी असलेला संबंध त्याच वेळचा आहे. पुरी हे पूर्वी परराष्ट्र खात्यात होते. २०१४ मध्ये भाजपची सत्ता येणार आहे हे दिसताच ते त्या पक्षात दाखल झाले. त्यानंतर वर्षभराने त्यांना मंत्री करण्यात आले. मधल्या काळात ते एपस्टीनशी संबंध वाढवत होते. वास्तविक एपस्टीन हा गंभीर गुन्ह्यात शिक्षा झालेला इसम आहे हे त्यांना ठाऊक होते. तरीही अमेरिकेतले बडे राजकारणी, नंतरच्या काळात ट्रम्प नावाचे अध्यक्ष इत्यादींशी चांगले संबंध जोडायचे तर हा दलाल उपयुक्त आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे पुरी त्याला अनेकदा भेटले. त्याच्या घरी गेले. एखाद्या मित्रासारखे त्याच्याशी पत्रव्यवहार करू लागले. कॉफी पिण्यासाठी भेटूया असे म्हणू लागले. या सगळ्याचे पुरावे एपस्टीन फाईल्समधील इमेल्समध्ये आहेत. पुरी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे एपस्टीनशी संबंध केवळ व्यावसायिक स्वरुपाचे होते. मोदी सत्तेत आल्यानंतर भारताचा वेगाने विकास होणार असून इंटरनेट आधारित उद्योगांना जबरदस्त वाव आहे हे एपस्टीनला पटवून देण्यासाठी आपण प्रयत्न करीत होतो असे ते सांगतात.

## पाणी मुरते आहे

पुरी यांचे म्हणणे खरे मानले तरीही यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. भारतासारख्या मोठ्या देशाला ट्रम्प असो की आणखी कोणी, त्यांच्याशी संबंध निर्माण करायला एपस्टीनसारख्या बायकांच्या धंद्यात अडकलेल्या दलालाची मदत घेण्याची गरजच का भासत होती? भारत किती प्रगती करतो आहे किंवा करणार आहे यावर अमेरिकेचे वा तिथल्या उद्योगपतींचे लक्ष असणारच. त्यासाठी एपस्टीनचा खास उपयोग झाला असण्याची शक्यता शून्य आहे. एपस्टीनमुळे लिंक्ड इनचा संस्थापक पुरी यांच्या संपर्कात आला असे या पत्रव्यवहारातून दिसते. पण लिंक्डइनच्या प्रमुखाला भारत ही किती मोठी बाजारपेठ आहे हे कळायला पुरींची भेट आवश्यक होती हे म्हणणेच हास्यास्पद आहे. याचाच अर्थ या पत्रव्यहारातून समोर येते त्याहूनही अधिक रहस्यमय असे काहीतरी या संबंधांमध्ये दडलेले आहे. २०१७ मध्ये मोदी इस्राइलला गेले. त्याचा उल्लेख एपस्टीनच्या पत्रात आहे. यामुळे ट्रम्प खूष होतील असे एपस्टीन म्हणतो. ट्रम्प यांना खूष करण्यासाठी मोदी इस्रायलला गेले होते काय आणि तिथे त्यांनी जे करार केले ते भारताच्या हितापेक्षा दुसऱ्या कोणत्या तरी उद्देशासाठी घडले काय असे प्रश्न यातून निर्माण होतात. त्यांचा खुलासा मोदी वा भाजपने स्पष्टपणे करायला हवा. पण त्यांची निव्वळ दडपादडपी चालू आहे. एपस्टीन फाईल्समधील अडचणीच्या या बाबींमुळेच मोदींनी अमेरिकेपुढे शरणागती पत्करली व भारताचे हित गहाण टाकून व्यापार करार केला असा आरोप राहुल गांधी यांना लोकसभेत केला. त्यावर त्याला उत्तर देण्याऐवजी त्यांची खासदारकी घालवण्याची भाषा भाजपवाले करीत आहेत. तसा ठराव लोकसभा अध्यक्षांकडे देण्यात आला आहे. याचाच अर्थ या प्रकरणात भयंकर काहीतरी पाणी मुरते आहे. मोदी यांचा उल्लेख अनिल अंबानी व एपस्टीन यांच्यातील संभाषणातही आहे. तिथे अंबानी जणू काही भारत सरकारच्या वतीने बोलल्याप्रमाणे लिहितो आहे. हे सर्वच संशयास्पद आहे. पण भाजपवाले यावर निव्वळ थयथयाट करीत आहेत. पुरी यांना काढून टाकले तर मोदींनाही अनेक प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. त्यामुळे होता होईल तो पुरी यांना काढले जाणार नाही.

## मोदींनी खुलासा करावा

यापूर्वी उत्तर प्रदेशात आंदोलक शेतकऱ्यांच्या अंगावर गाडी घालून त्यांना ठार मारल्याचा आरोप असलेल्या मुलाचा बाप मोदींच्या मंत्रिमंडळात मंत्री होता. हा मुलगा तुरुंगात गेला तरीही मोदींनी त्या बापाला हटवले नव्हते. पुरींनादेखील मोदींनी असेच संरक्षण दिलेले दिसते. म्हणूनच ते काल मिडियासमोर आले व त्यांनी राहुल यांची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न केला. पण यातून पुरी आणि भाजपवाले हे नैतिकदृष्ट्या किती खालच्या पातळीला गेले आहेत त्याचेच दर्शन घडले. एपस्टीनने लिंगपिसाटपणाचा गुन्हा स्वतः कबूल करून शिक्षा भोगली होती. तरीही पुरी यांनी हा किरकोळ गुन्हा असल्याचा अभिप्राय काल व्यक्त केला. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपचीही हीच भूमिका असावी. अन्यथा, एपस्टीनसारख्या माणसामार्फत संबंध निर्माण करायला त्यांनी मान्यता दिली नसती. युरोपातील अनेक राजकारणी, बँकर्स इत्यादींनी एपस्टीनसोबत आपण संबंध जोडले याबद्दल खेद व्यक्त केला आहे व अनेकांनी राजीनामे दिले आहेत. पुरी हे मात्र राजीनाम्याचे सोडाच पण साधी माफीही मागायला तयार नाहीत. कोवळ्या वयातील मुलींचा व्यापार करणाऱ्या दलालाची आपण मदत घेत होतो याची किमान लाजही या लोकांना वाटत नाही. शिवाय ही मदत ते वैयक्तिक कारणासाठी नव्हे तर भारत नावाच्या एका देशाच्या वतीने मागत होते हे लांच्छनास्पद आहे. समजा त्यावेळी एपस्टीनच्या गुन्ह्यांच्या गांभीर्याची त्यांना जाणीव झाली नाही असे गृहित धरले तरी आता तरी यांनी त्याविषयी शरम दाखवायला हवी. आपल्याकडून चूक झाली म्हणून प्रायश्चित्त घ्यायला हवे. त्याऐवजी हे पुरी यांच्यासारख्यांना पाठीशी घालत आहेत आणि मोदी यांच्यावर आरोप झाले तर त्यांचे उत्तर न देता नेहरू व इंदिरा गांधी यांच्यावर गलिच्छ आरोप करीत आहेत. एपस्टीनच्या काळ्या धंद्यांशी पुरी, अंबानी किंवा मोदींचा संबंध होता किंवा ते त्यात गुंतलेले होते असे कोणीही म्हणत नाही वा तसा आरोपही कोणी केलेला नाही. मात्र २००८ मध्येच जो गुन्हेगार ठरला आहे त्याच्याशी संबंध ठेवण्याचे पाप या लोकांनी केले आहे असा आरोप त्यांच्यावर आहे. एपस्टीन फाईल्समधील पत्रांचा आधार त्याला आहे. तो खोटा ठरत असेल तर सर्व भारतीयांना आनंदच होईल. पण मोदी आणि मंडळी जी दडपादडपी करीत आहेत त्यामुळे संशय अधिकाधिक वाढत चालला आहे. हा संशय दूर करण्यासाठीचे पहिले पाऊल म्हणजे पुरी यांनी राजीनामा देणे किंवा त्यांना पदावरून घालवणे. आणि दुसरे पाऊल म्हणजे मोदींनी याबाबत स्वतः किंवा भाजप नेत्यांमार्फत स्पष्ट निवेदन करणे. तसे झाले तरच संशयाचे काळे ढग दूर होतील.

विचार

# गरज पारेषणातील त्रुटी दूर करण्याची

***भारतामध्ये पारेषण अर्थात वीजेच्या वहनाची पायाभूत सुविधा ही एक मोठी कमतरता बनली आहे. वीजनिर्मिती क्षमता, हरित ऊर्जानिर्मिती आणि वीजेचा वापरही वेगाने वाढत आहे. तथापि, पारेषण पायाभूत सुविधांनी या गतीशी ताल राखलेला नाही. गेल्या पाच वर्षांमध्ये त्यांचा वार्षिक वाढीचा दर सुमारे तीन टक्के राहिला आहे. ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्या निमित्ताने घेतलेला मागोवा.***

प्रा. सुखदेव बखळे

भारतात वीज क्षेत्रात कार्यरत असलेल्या वीजनिर्मिती, पारेषण (वहन) आणि वितरण अशा तीन कंपन्यांपैकी उच्च दाबांच्या वाहिन्यांमधून विजेचे वहन घडवण्यास जबाबदार असलेली वीज पारेषण ही अतिशय महत्त्वाची कंपनी आहेत. देशात वेगवेगळ्या योजनांमधून वीज पारेषणसाठी निधी दिला जात असतो. या क्षेत्रातील पायाभूत सुविधांवर खर्च केला जात असतो. देशात वीज पारेषण नेटवर्क आणि त्यासाठी पायाभूत क्षेत्रात सुरू असलेली कामे याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

भारताचे 'हाय व्होल्टेज वीज पारेषण नेटवर्क' २२० किलोवॉट आणि चार लाख ९५ हजार सर्किट किलोमीटर (सीकेटी किलोमीटर) पर्यंत पसरले आहे. या प्रक्रियेमध्ये आज प्रत्यावर्ती धारा (एसी – ऑल्टरनेट सायकल) परिवर्तन क्षमता अंदाजे १३ लाख ५४ हजार मेगावॉटपर्यंत पोहोचली आहे. तिला १८ हजार मेगावॉटपेक्षा जास्त वाढत्या 'हाय व्होल्टेज डायरेक्ट करंट' (एचव्हीडीसी) लाइन क्षमतेने बळ मिळाले आहे. त्यामुळे दूरवर मोठ्या प्रमाणात विजेचे कार्यक्षमतेने वहन करणे शक्य होते. तथापि, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे १५ हजार 'सर्किट किलोमीटर'च्या उद्दिष्टाच्या तुलनेत केवळ ८,८३० सर्किट किलोमीटर नवीन पारेषण लाइन्स कार्यान्वित झाल्या. असे असले, तरी एकूण गरजेच्या हे प्रमाण जवळपास ४० टक्क्यांनी कमी आहे. आंतरराज्य पारेषण प्रणालीमध्ये (आयएसटीएस) झालेली वाढ एका दशकातील सर्वात कमी आहे. अहवालात नमूद केले आहे, की ७१ टक्क्यांपर्यंत 'आयएसटीएस कॉरिडॉर' तीस टक्क्यांपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत आहेत. जून २०२५ पर्यंत भारताची राष्ट्रीय ग्रीड पारेषण क्षमता अंदाजे एक लाख वीस हजार ३४० मेगावॉट होती. नऊ ट्रिलियनपेक्षा जास्त गुंतवणुकीने ही क्षमता एक लाख ६८ हजार मेगावॉटपर्यंत वाढवण्याची योजना आहे. तथापि, पारेषण पायाभूत सुविधांच्या विकासाचा वेग अक्षय ऊर्जा प्रकल्पांच्या कार्यान्वित होण्याच्या वेळापत्रकापेक्षा मागेच आहे. या विलंबाचे मुख्य कारण पारेषण प्रकल्पांशी संबंधित मंजुरी, भूसंपादन आणि नियामक परवानग्यांसाठी लागणारा जास्त वेळ हे आहे.

२०३० साठी भारताच्या पारेषण वाहिनी नेटवर्कच्या नियोजनाला विलंब आणि विसंगतींचा सामना करावा लागत आहे. त्याचे मूळ राज्यांनी घोषित केलेल्या नवीकरणीय ऊर्जा (आरई) क्षमतेमध्ये आणि विकसक मागत असलेल्या कनेक्टिव्हिटी क्षमतेतील तफावतीमध्ये आहे. ही विसंगती पारेषण प्रणालीचे नियोजन गुंतागुंतीचे करते. त्यामुळे अनेकदा विविध कॉरिडॉरमध्ये गरजांचा अतिअंदाज किंवा कमी अंदाज लावला जातो. परिणामी, अनेक वीजनिर्मिती प्रकल्प कनेक्टिव्हिटी असूनही पारेषणामधील अडथळे किंवा अवरुद्ध कॉरिडॉरमुळे पूर्णपणे वापर करू शकत नाहीत. याव्यतिरिक्त आगामी प्रकल्पांसाठी नवीन कनेक्टिव्हिटी मर्यादित आहे आणि हरित ऊर्जेच्या वहनासाठी पुरेशी पारेषण क्षमता उपलब्ध होण्यापूर्वी दोन वर्षे किंवा त्याहून अधिक काळाचा विलंब अपेक्षित आहे. परिणामी, अनेक नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प रखडले आहेत किंवा त्यांच्या नियोजित क्षमतेपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय निर्मितीची उद्दिष्ट्ये साध्य करण्यावर परिणाम होत आहे.'टॅरिफ-आधारित स्पर्धात्मक बोली' (टीबीसीबी) प्रणालीअंतर्गत विकसित केलेल्या पारेषण वाहिनी प्रकल्पांमधील एक प्रमुख आव्हान म्हणजे पारेषण परवान्याचा कालावधी (२५ वर्षे) आणि पारेषण सेवा करार (टीएसए) कालावधी (३५ वर्षे) यातील विसंगती. ही तफावत कर्जदात्यांसाठी जोखीम मूल्यांकन आणि आर्थिक वचनबद्धता गुंतागुंतीची करते. त्यामुळे प्रकल्पाच्या वित्तपुरवठ्यामध्ये अनिश्चितता येते. कर्जदात्यांना मार्गाधिकार संपादनातील विलंब, प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील संथपणा आणि वस्तूंच्या किमतींमधील चढ-उतार यासारख्या सततच्या समस्यांनाही सामोरे जावे लागते. प्रकल्पाच्या वेळापत्रकावर आणि आर्थिक व्यवहार्यतेवर या सर्वांचा परिणाम होतो. आयोगांकडून/सरकारी प्राधिकरणांकडून होणारा नियामक विलंब आणि मार्गाधिकारातील अडथळे प्रगतीमध्ये अडथळा निमर्ण करत आहेत, तर वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे बजेट अनेकदा सुरुवातीच्या अंदाजापेक्षा वाढते. हे घटक एकत्रितपणे कर्जदात्यांचा आत्मविश्वास कमी करतात आणि पारेषण पायाभूत सुविधांच्या विकासाचा वेग मंदावतात. तो नवीकरणीय ऊर्जानिर्मितीच्या वाढीशी सुसंगत राहण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

'सेंट्रल ट्रान्समिशन युटिलिटी ऑफ इंडिया लिमिटेड' (सीटीयूआयएल) ने २०२५ मध्ये सुमारे १७ गीगावॉट नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांची कनेक्टिव्हिटी रद्द केली. राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेश यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेने समृद्ध राज्यांमधील विलंबित आणि रखडलेल्या प्रकल्पांना लक्ष्य करून ही कारवाई करण्यात आली. विजेच्या वाढत्या मागणीचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यरत आणि पूर्णत्वाच्या जवळ असलेल्या प्रकल्पांना ग्रीडमध्ये प्रवेशासाठी प्राधान्य देणे हा यामागील उद्देश होता. पारेषण क्षेत्रात मार्गाधिकार (आरओडबल्यू) आव्हाने कायम असताना भारतामध्ये उद्योगक्षेत्रातील खेळाडूंना अतिरिक्त अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. ट्रान्सफॉर्मरसारख्या दीर्घ-प्रतीक्षा कालावधीच्या उपकरणांसाठी मर्यादित पुरवठा साखळी ही एक प्रमुख चिंता आहे, जिथे प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी वेळेवर वितरण महत्त्वाचे आहे. मोठ्या प्रमाणात वीज प्रेषणासाठी मर्यादित कॉरिडॉर उपलब्ध असल्याने 'हाय व्होल्टेज डायरेक्ट करंट' (एचव्हीडीसी) पारेषण नेटवर्कचा विस्तार करणे आवश्यक आहे. भारतातच 'एचव्हीडीसी' सारख्या नवीन तंत्रज्ञानाचे संशोधन आणि विकास करण्यास प्रोत्साहन देण्याची गरज आहे, कारण 'एचव्हीडीसी' प्रणालींच्या निर्मितीसाठी लागणारा वेळ जास्त असतो आणि भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठी लवकर गुंतवणूक करणे आवश्यक आहे. विकासकांसाठी आणखी एक गंभीर समस्या म्हणजे ३५ वर्षांच्या जीवनचक्रासाठी पारेषण मालमत्तेसाठी एकच दर उद्धृत करण्याची आवश्यकता. त्यात संचालन आणि देखभालीशी (ओसीएम) संबंधित वाढीसाठी कोणतीही तरतूद नाही. सध्याच्या नियमांनुसार, कायद्यातील बदलामुळे होणारी कोणतीही वाढ केवळ कार्यान्वित करण्याच्या (सीओडी) वेळी विचारात घेतली जाते. त्यामुळे विकसकांना दीर्घकालीन आर्थिक अनिश्चिततेचा सामना करावा लागतो. ही आव्हाने एकत्रितपणे भारताच्या पारेषण पायाभूत सुविधांच्या वेळेवर आणि शाश्वत वाढीला पाठिंबा देण्यासाठी धोरणात्मक आणि नियामक सुधारणांची आवश्यकता अधोरेखित करतात. भारताची पारेषण प्रणाली कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे मजबूत केली गेल्यास देशाच्या प्रचंड नवीकरणीय ऊर्जाक्षमतेला चालना देण्यासाठी त्यात प्रचंड क्षमता आहे. सरकारच्या 'ग्रीन एनर्जी कॉरिडॉर उपक्रमाचा आंतरराज्य आणि आंतरराज्य पारेषण नेटवर्कच्या सध्याच्या सुधारणांसह, पारेषण वाहिनीची लांबी सुमारे साडेसहा लाख सर्किट किलोमीटरपर्यंत वाढवण्याचे आणि परिवर्तन क्षमता २.३ दशलक्ष मेगावॉटपेक्षा जास्त वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. अलीकडील धोरणात्मक सुधारणा, ज्यामध्ये जमिनीच्या नुकसानभरपाईसाठी अद्ययावत मार्गदर्शक तत्त्वे, वीज उपकेंद्राच्या स्थानासाठी शिथिल केलेले नियम, नियमांद्वारे लागू केलेल्या प्रकल्पांच्या कठोर वेळापत्रकांचा समावेश आहे. विद्यमान पारेषण मालमत्तेच्या चांगल्या वापरासाठी दिलेल्या प्रोत्साहनामुळे नवीन प्रकल्पांना मंजुरी मिळण्यास गती मिळण्याची अपेक्षा आहे. वेळेवर पायाभूत सुविधांची सज्जता सुनिश्चित करण्यासाठी या सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत.

राज्य पारेषण उपयुक्ततांची (एटीयू) भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. ती केंद्रीय पारेषण उपयुक्ततांच्या प्रयत्नांना पूरक ठरते. भविष्यात 'एसटीयू'ज आंतरराज्य पारेषण प्रकल्पांसाठी दर-आधारित स्पर्धात्मक बोली (टीबीसीबी) यंत्रणा स्वीकारतील, अशी अपेक्षा आहे. या बदलामुळे स्पर्धेला चालना मिळेल, खासगी गुंतवणूक आकर्षित होईल आणि देशभरात पारेषण पायाभूत सुविधांचा वेगवान विकास शक्य होईल. सध्या देशाच्या नवीकरणीय ऊर्जेच्या महत्त्वाकांक्षेपुढे काही आव्हाने आहेत. धोरणात्मक गुंतवणूक, लक्ष्यित नियामक सुधारणा, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर आणि 'टीबीसीबी' प्रकल्पांसारख्या उपक्रमांच्या समन्वित अंमलबजावणीद्वारे भारत आपली पारेषण प्रणाली नवीकरणीय ऊर्जेसाठी एक मजबूत सक्षम कर्ता म्हणून रूपांतरित करू शकतो. यामुळे हरित ऊर्जेचे विश्वसनीय आणि कार्यक्षम वहन तसेच वापर सुनिश्चित होईल. त्यामुळे देशाला स्वच्छ ऊर्जा संक्रमणाच्या ध्येयांकडे जाण्यास मदत होईल. पायाभूत सुविधांमधील तफावत भरून काढण्यासाठी एकात्मिक नियोजन दृष्टिकोन स्वीकारण्याच्या बाबतीत देश योग्य मार्गावर आहे. रस्ते, रेल्वे, जहाज वाहतूक आणि नागरी विमान वाहतूक यासारख्या सर्व माध्यमांमधील वाहतूक धोरणांमध्ये समन्वय साधण्यासाठी एकात्मिक वाहतूक नियोजन संस्था (आयटीपीए) स्थापन करण्याचा भारत सरकारचा अलीकडील प्रस्ताव हे याचे उत्तम उदाहरण आहे. त्याचप्रमाणे ऊर्जा क्षेत्रातही, निर्मिती, पारेषण आणि वितरण या सर्व स्तरांवर क्षमता वाढवण्यासाठी एकात्मिक नियोजन दृष्टिकोन ही काळाची गरज आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# विद्यार्थ्यांचे स्वप्न धुळीत

वैभव पाटील

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून वाहनचालकांना खड्डे चुकवताना मोठी कसरत करावी लागते. त्यातच काही दिवसांपासून या अलिबाग-रोहा मार्गावरील अलिबाग बायपास ते बेलकडे या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. त्याआधी रस्त्याचे खोदकाम, त्यांनतर दगड मातीचा भराव करण्यात आला. या ठिकाणी कंत्राटदाराकडून खोदलेल्या रस्त्यावर पाणी टाकून धुळ उडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे होते. मात्र, एखादे अवजड वाहन या रस्त्यावरून गेल्यावर प्रचंड प्रमाणात धुळ उडून त्याचा नाहक त्रास पादचाऱ्यांसह छोट्या वाहनचालकांना होत आहे. त्यातच सोमवारी सकाळपासून कुरूळ येथील अरूंद वळणावरून रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाला सुरूवात करण्यात आली. त्यामुळे नियोजनाअभावी याठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यातच सुमारे दोन तास प्रवासी वर्गाला धुळ खात वाहतुक कोंडीत अडकून बसावे लागले. नुकतीच दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची परिक्षा सुरू झाल्याने त्याचा मोठा त्रास त्यांना देखील सहन करावा लागला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे स्वप्न धुळीत जात असल्याचे पालकवर्गातून बोलले जात आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे खोदकाम, अपूर्ण डांबरीकरण, अरुंद मार्ग आणि योग्य वाहतूक नियंत्रणाचा अभाव यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. रस्त्यावर तात्पुरती लावलेली मलमपट्टीदेखील उखडल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीत रस्त्यावरील खड्डे चुकवत प्रवास करणाऱ्या नागरिकांना आता धुळीचा त्रास साहन करत आहे. या रस्त्यावरून मोठे वाहन गेल्यानंतर मागून जाणाऱ्या दुचाकी चालकाच्या नाका-तोंडात धूळ जाते. रस्त्यावर काही काळ थांबल्यास संपूर्ण धूळ अंगावर थराप्रमाणे साचत असून याच दरम्यान श्वसनातून शरीरात धूळ जाण्याची



शक्यता आहे. त्यामुळे लोकांचे आजारी होण्याचे प्रमाण देखील वाढल्याचे चित्र आहे. या धुळीचे कण अनेकांच्या नाका तोंडात जात आहे. त्यामुळे काही जण नाक दाबून तर काही जण तोंडाला कपडा बांधून प्रवास करीत आहेत. धुळीच्या प्रमाणात दुपटीने वाढ झाली आहे. या धुळीमुळे ॲलजी तसेच श्वसनाच्या विकाराची लागण होत असून, त्याचे दूरगामी परिणाम आरोग्यावर होत आहे. शहरातील वर्दळीच्या प्रमुख रस्त्यांची देखील दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मातीमिश्रीत मुरुम टाकला जात असल्यामुळे आणखीनच धुळीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे रस्त्यांवर चष्म्याविना किंवा तोंडाला दुपट्टा न बांधता वाहन चालवणे अवघड झाले आहे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येक वाहनामुळे धूळ उडताना दिसून येते. या रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती न केल्यास धुळीचा प्रश्न कायम राहील.

जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या अलिबाग शहरात शासकीय व निमशासकीय कामांसाठी जिल्ह्याभरातून येत असतात. त्याचप्रमाणे पर्यटक देखील त्यांच्या वाहनांमधून या मार्गावरून प्रवास करीत आहेत. मात्र, रस्त्यावरील धुळीमुळे प्रवास करणे नकोसे झाले आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रवाशांसह स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या गलथान कारभारामुळे खोकला, सर्दी, घसा दुखण्यासारखे आजार वाढण्याची भिती निर्माण झाली आहे. वारंवार मागणी करूनही या रस्त्याच्या कामाचा वेग प्रशासनाकडून वाढवला जात नाही. प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांची या जाचातून कधी सुटका होणार, असा प्रश्न त्रस्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.

नुकतेच अलिबाग-रोहा या मुख्य मार्गावरील अलिबाग ते बेलकडे यादरम्यानच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाला सुरूवात करण्यात आली आहे. या भागात नेहमीच वाहनांची वर्दळ असते. सुट्टीच्या दिवसांत तर या मार्गावरील वाहतूक कोंडी सोडवताना वाहतुक पोलिसांची देखील दमछाक होते. आता कुरूळ येथील वळणावर रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामामुळे तर प्रवासी वर्ग सोमवारी सकाळी जवळजवळ दोन तास वाहतुक कोंडीत अडकला होता. सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. मात्र, ठेकेदाराच्या अनियोजित कारभारामुळे त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसला आहे. त्यांना परिक्षा केंद्रावर वेळेवर पोहोचण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. दुचाकी जाईल एवढी देखील जागा रस्त्यावर उपलब्ध नव्हती. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी पायपिट करत परिक्षा केंद्राचा रस्ता धरला. मात्र, पुढच्या बाजुला रस्ता खोदला असल्याने आणि दगड मातीच्या भरावामुळे त्यांना नाक-तोंड दाबुन चालत जावे लागले. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर देखील मोठा परिणाम होण्याची शक्यता असून शैक्षणिक नुकसान होण्याची चिंता पालक वर्गातून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी समाज आणि प्रशासन दोघांनीही संवेदनशीलतेने सहकार्य करणे गरजेचे असल्याची भावना नागरिकांसह पालकवर्गातून व्यक्त होत आहे.

लोकसंसद

## पाच लाखात मोजणारी व्यवस्था!

मुलुंड येथे झालेली मेट्रो दुर्घटना अत्यंत दुर्दैवी असून त्यात निष्पाप नागरिकांचा जीव गेला आहे. या दुर्घटनेमुळे मेट्रोच्या कामातील गलथान कारभार उघडकीस आला आहे. मेट्रोचे काम 'मिलन रोड बिल्ड टेक' या पटेल कंत्राटदाराकडे देण्यात आले आहे. मुंबईत मोठ्या आणि अनुभवी इन्फ्रास्ट्रक्चर कंपन्या असताना, मेट्रोसारखे अत्यंत महत्त्वाचे काम कधीही नाव न ऐकलेल्या 'मिलन रोड बिल्ड टेक'सारख्या कंपनीला कसे काय देण्यात आले, हा गंभीर प्रश्न आहे. सुरक्षेचे सर्व नियम धाब्यावर बसवून दिवस-रात्र मेट्रोचे काम सुरू आहे. आवाजाचे आणि धुळीचे प्रदूषण प्रचंड वाढले असून, त्याचा थेट परिणाम मुंबईतील हवेच्या गुणवत्तेवर होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. मग कंत्राटदारांची गुणवत्ता कोणत्या निकषांवर मोजली गेली? कोणते मापदंड लावून या कंत्राटदारांना कंत्राटे देण्यात आली? की ही कंत्राटे 'वाटा' घेण्यासाठीच वाटली गेली? कंत्राटदारांना पाच कोटी रुपयांचा दंड आणि मृतकांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची नुकसानभरपाई हे शासनाचे कोणते समीकरण आहे? सुरक्षेचे नियम पायदळी तुडवले जात असताना संबंधित शासकीय अधिकारी वेळीच या कंत्राटदारांवर दंड का ठोठावत नाहीत? ही प्रशासनाची दिरंगाई आहे की मेट्रो प्रकल्प लवकर पूर्ण करण्याची घाई? आज मुंबईभर सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून कामे सुरू आहेत. त्यामुळे मुंबईकरांनी स्वतःची काळजी स्वतःच घ्यावी, कारण या व्यवस्थेत तुमच्या जीवाची किंमत फक्त पाच लाख रुपये आहे.

**– दत्तप्रसाद शिरोडकर, मुलुंड**

दिनविशेष

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली.

भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करताना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले.

मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१७ फेब्रुवारी**

१) श्रीम. सुवर्णा काशिनाथ क्रमवंत
अलिबाग, १७-२-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (**बीपीन राठवा**) ९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**तनया प्रताप गंभीर**
**वाढदिवस, अलिबाग**

## पनवेलमध्ये 'स्वच्छ वॉर्ड' रँकिंग स्पर्धा

**पनवेल :** महापालिकाच्या वतीने स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'स्वच्छ वॉर्ड रँकिंग स्पर्धा २०२६'मुळे शहरात स्वच्छतेची चळवळ अधिक बळकट होणार आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग, पारदर्शक मूल्यमापन प्रक्रिया आणि प्रोत्साहनपर रोख पारितोषिके यांच्या माध्यमातून पनवेल स्वच्छतेत नवा आदर्श निर्माण करणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी स्पष्ट केले. स्पर्धेसाठी अर्ज प्रक्रिया ११ ते २० फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात येत असून, गृहनिर्माण संस्था, शाळा, हॉटेल्स, शासकीय कार्यालये, रुग्णालये आणि मार्केट्स यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे. या स्पर्धेची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे प्रभागस्तरावर २१ ते २५ फेब्रुवारीदरम्यान प्रत्यक्ष स्थळ पाहणी होणार असून, त्यातून प्रत्येक गटातील सर्वोत्तम तीन स्पर्धकांची निवड केली जाणार आहे. या निवडलेल्या स्पर्धकांचे शहरस्तरीय समितीकडून पुनर्मूल्यांकन होऊन अंतिम गुणांकन निश्चित करण्यात येणार आहे. कचरा वर्गीकरण, दैनंदिन स्वच्छता, शून्य कचरा उपक्रमाची अंमलबजावणी, परिसराची देखभाल आणि जनजागृती या निकषांवर आधारित एकूण १,५०० गुणांचे मूल्यमापन होणार आहे. त्यामुळे ही स्पर्धा केवळ बक्षिसापुरती मर्यादित न राहता स्वच्छतेची सवय रुजविण्याचा व्यापक उपक्रम ठरणार आहे. स्पर्धेचा अंतिम निकाल १ मार्च २०२६ ला जाहीर होणार असून, त्याच दिवशी बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. गृहनिर्माण संस्थांसाठी प्रथम पारितोषिक २१ हजार, द्वितीय १५ हजार व तृतीय ११ हजार अशी रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

# बुलेट ट्रेनमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**● पंप लावून पाणी बाहेर काढण्याचा प्रयत्न;१०० एकर शेती खाऱ्या पाण्याखाली**

**। सफाळे । प्रतिनिधी ।**

विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या घामावर पाणी फेरले जात असल्याचे धक्कादायक चित्र सफाळे-विरार दरम्यानच्या नारिंगी जुली बेटावर समोर आले आहे. एका बाजूला खारभूमी विकास विभागामार्फत खारलँड बंधाऱ्याचे काम सुरू असताना, दुसऱ्या बाजूला बुलेट ट्रेनच्या कामामुळे शेकडो शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत.



कार्यकारी अभियंता, खारभूमी विकास विभाग, कळवा (ठाणे) यांच्या मार्फत उभारला जाणारा पाच किलोमीटर खारलँड बंधारा पूर्ण झाल्यास भात शेतीस मोठा दिलासा मिळणार आहे. गेल्या दोन महिन्यांपासून या बंधाऱ्याचे काम सुरू आहे. मात्र, त्याच परिसरात सुरू असलेल्या बुलेट ट्रेनच्या कामातून बाहेर पडणारे खारे पाणी थेट भात शेतीत पंपाने सोडले जात असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. परिणामी सुमारे १०० एकर क्षेत्र खाऱ्या पाण्याखाली गेले असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी स्वतःच्या खर्चाने एक ट्रॅक्टर पंप आणि दोन डिझेल पंप लावून पाणी बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र, गेल्या तीन महिन्यांपासून पाण्याचा निचरा होत नसल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली आहे.

या संदर्भात बुलेट ट्रेन व्यवस्थापनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. विकास प्रकल्प आमच्या डोक्यावरून जात आहे, पण आमचे अस्तित्वच पाण्यात बुडवले जात आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने शेतकरी आता आक्रमक झाले आहेत. योग्य ती नुकसानभरपाई आणि तत्काळ उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांचा आक्रोश दबला जाणार का, की प्रशासन जागे होऊन न्याय देणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

> **"आदिवासी संरक्षित जमिनीवरील १५० हून अधिक खोल्यांवर प्रशासनाचा हातोडा.बुलेट ट्रेनच्या कामामुळे येथील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र अद्याप कोणतीही नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही. प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास शेतकरी रस्त्यावर उतरतील.**
> **–बाळकृष्ण पाटील,**
> **खारभूमी लाभार्थी सहकारी संस्थेचे अध्यक्ष"**

# दुचाकींसाठी नवीन मालिका होणार सुरु

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी MH46DG ही नवीन नोंदणी मालिका लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या मालिकेतील आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक विहित शुल्क भरून घेऊ इच्छिणाऱ्या वाहनधारकांनी दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० या वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांच्याकडून करण्यात आले आहे. अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत डिमांड ड्राफ्ट (DD), निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रती खाजगी वाहन विभागात जमा कराव्यात. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची यादी दि. १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.०० वाजता कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अर्जदारांनी दि. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी २.३० वाजेपूर्वी इच्छित जास्तीच्या रकमेचा डीडी बंद लिफाफ्यात जमा करणे आवश्यक राहील. त्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (नवीन वाहन नोंदणी विभाग) यांच्या दालनात लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे.

अर्जदारांना सर्वसाधारण सूचना पुढीलप्रमाणे :- डिमांड ड्राफ्ट "RTO PANVEL' यांच्या नावे नॅशनलाइज्ड किंवा शेड्युल्ड बँकेचा असावा व तो दोन महिन्यांपेक्षा जुना नसावा. अर्जासोबत पॅनकार्ड, ई-आधारकार्ड व पत्त्याचा पुरावा साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे. लिलावाकरिता जमा करण्यात येणारा डीडी सिलबंद पाकिटात सादर करावा. विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचा किंवा दोन महिन्यांपेक्षा जुना डीडी स्वीकारला जाणार नाही. एकदा राखीव ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. राखीव दिनांकापासून १८० दिवसांत वाहन नोंदणीसाठी सादर न केल्यास क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेली फी शासन जमा होईल. आकर्षक क्रमांकासाठी भरलेली फी कोणत्याही परिस्थितीत परत अथवा समायोजित केली जाणार नाही. चालू मालिका पूर्ण झाल्यानंतरच नवीन मालिका सुरू होणार असून, आगाऊ स्वीकारलेल्या अर्जांच्या पावत्या जुन्या मालिकेतील क्रमांक संपल्यानंतरच जारी केल्या जातील. आकर्षक क्रमांकाबाबत अधिक माहितीसाठी परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी असे सांगण्यात आले आहे.

## खारघरमध्ये स्वच्छता मोहीम वेगात

**खारघर :** गुरू तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर येथे आयोजित 'हिंद-दी-चादर' या भव्य कार्यक्रमासाठी नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. यामुळे संपूर्ण परिसरात प्रशासनाची धावपळ सुरू झाली आहे. खारघर येथील सिडकोच्या कॉर्पोरेट मैदानावर २८ फेब्रुवारी आणि १ मार्चला हा ऐतिहासिक सोहळा पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून मैदान आणि परिसरातील रस्त्यांची साफसफाई, रंगरंगोटी तसेच खड्डे बुजविण्याची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

## सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचा वर्धापन दिन

**। तळा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा सेवानिवृत्त संघटना संलग्न तालुका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचा तेरावा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भानू मंचेकर होते. तर व्यासपीठावर धुरंदर मडवी, सुरेंद्र जाधव, जिल्हा कारखाने, द्वारकानाथ वर्तक, काशिनाथ जाधव, नयन कर्णिक, शांताराम गायकवाड , महादेव भोईर, अशोक कासार, मारुती शिर्के, अब्बास गोलंदाज, पांडुरंग खैरे, बाळाराम चव्हाण, जनार्दन घोडके, कृष्ण अलवारे, पद्मा गाडगीळ, मनीषा कोतवाल, सुनिता पाटील, नामदेव भौड, शरद चव्हाण, गोविंद ठाकूर, रमेश शिंदे, मनोहर चव्हाण गणेश वेदक यांचेसह सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी पेन्शन, वेतन आयोग, वेतनश्रेणी, प्रमोशन, सेवा ज्येष्ठता, प्रशिक्षण या विषयावर सखोल चर्चा केली. यावेळी शांताराम गायकवाड, नयन करणे, पुरुषोत्तम मुळे, द्वारकानाथ वर्तक, काशिनाथ जाधव यांनी देखील आपले मनोगत आणि सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या असणाऱ्या समस्या विविध शासनाने निर्णय त्यामुळे होणारे फायदे, तोटे यावर उत्तम प्रकारे मार्गदर्शन करताना संघटना ही काळाची गरज आहे. त्याद्वारे आपण आपल्यावर अन्याय होत असेल तर शासन दरबारी दाद मागू शकतो किंवा संघटना वाढीसाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे, असे सांगून जिल्हा व राज्य संघटनेचे सभासद व असे आव्हान करण्यात आले.






**महाशिवरात्रीनिमित्त अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव येथे श्री बोरेश्वर महाराजांची पालखी काढण्यात आली. यामध्ये नवगाव आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

## हळदी कुंकू निमित्ताने महिलांचे सक्षमीकरण

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील होनाड ग्रामपंचायत हद्दीतील प्रासोल केमिकल्स लि.कंपनीच्या वतीने तीन ग्रामपंचायतीच्या हद्दीतील महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ व या निमित्ताने ग्रामीण महिलांसाठी सक्षमीकरण उपक्रमाचे आयोजन शनिवारी (दि.१४) रोजी येथील पाताळगंगा विद्यालय व विद्या प्रकाश इंग्लिश स्कुलच्या मैदानावर करण्यात आले होते. कार्यक्रमात शेकडो महिलांनी सहभाग घेतला. कंपनीच्या सामाजिक दायित्व उपक्रमाच्या अंतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



खालापूर तालुक्यातील प्रासोल केमिकल्स लि. ही कंपनी कंपनी सामाजिक बांधिलकी जपत मागील पाच वर्षांप्रमाणे यावर्षीही साजगाव, होनाड आणि आत्करगाव ग्रामपंचायतीच्या महिलांसाठी सामूहिक हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन कारण्यात आले होते. या निमित्ताने ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरण होण्यासाठी ग्रामीण भागातील खाद्यपदार्थ दुकाने हे मेळाव्याचे खास आकर्षण होते.

यावेळी खोपोलीतील मतीमंद मुलांच्या शालेम या शाळेला सामाजिक मदत म्हणून शाळेतील मुलांनी बनविलेली पुष्पगुच्छ विकत घेऊन ती या कार्यक्रमाला वापरण्यात आली.

कार्यक्रमास रेश्मा पाटील, प्रकाश पाटील, विनोद खवळे, रीना देशमुख, विलास पाटील, शोभा शेट्टेण , संदीप खोपकर, रूपाली विचारे, श्रद्धा देशमुख, संगीता मारोथिया, वाडकर, यांच्या सह अन्य महिला अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते उपस्थित महिलांना हळदी कुंकू, वाण आणि भेटवस्तू देण्यात आली.

# निवडक



## कर्जतकरांनी घेतले महादेवाचे दर्शन

**कर्जत :** महाशिवरात्री असल्याने कर्जत तालुक्यातील महादेवाच्या प्रत्येक मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तालुक्यातील प्रत्येक मंदिराच्या बाहेर दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा दिसत होत्या. बहुतांश मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते सायंकाळी श्री कपालेश्वराची पालखी मिरवणूक काढण्यात आली. रात्री नऊ वाजे पर्यंत कर्जतकरांनी पालखीतील कपालेश्वराचे मनोभावे दर्शन घेतले. तालुक्यातील पांडवकालीन वैजनाथ येथील मंदिरात शिवभक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. वैजनाथ येथील मंदिरात शिवभक्तांसाठी यात्रा तेथे भरली होती. दिवसभर कर्जत तालुक्याबरोबर अन्य तालुक्यातील भाविक यांची दर्शनासाठी वर्दळ सुरु होती. कोल्हारे येथे त्रिवेणी संगमावर असलेल्या पांडवकालीन शिवमंदिरामध्ये शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी सकाळी प्रचंड गर्दी झाली होती. याशिवाय देऊळवाडी, कोल्हारे, लाखरन, कोषाणे, साळोख, तमनाथ, माथेरान, मानिवली, बिरदोले, शेलू, धामोते येथील धनेश्वरी, नेरळमधील कुसुमेश्वर मंदिर, निर्माण नगरी येथील शिवमंदिर, मोहाचीवाड़ी, भड़वळ, कळंब, पोही, खांडस, देवपाड़ा, वंजारपाडा, गुढवण, कशेळे, वारे, कोठींबे, आंबिवली, मांडवणे, लाखरन, चांदई, कडाव, बीड, देऊळवाड़ी आदी ठिकाणी असलेल्या शिव मंदिरात सर्वत्र भक्तांची गर्दी होती. माथेरान येथील पिसरनाथ महाराज तसेच कर्जतमधील धापया आणि कपालेश्वर येथील मंदिरात असंख्य धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरु होती.

## तळगड किल्ल्यावर भाविकांची गर्दी

**तळा :** महाशिवरात्री निमित्त तळा शहरातील ऐतिहासिक तळगड किल्ल्यावरील शिवपिंडीचे दर्शन घेण्यासाठी शिवभक्तांची एकच गर्दी उसळली. जयहरी सेवा मंडळ तळातर्फे तळगड किल्ल्यावर गेल्या १८ वर्षांपासून महाशिवरात्री उत्सव आयोजित करण्यात येत आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी ८ वाजता शिवपिंडीवर अभिषेक करण्यात आला व १० वाजता तळा शहरातून चलचित्र भव्य मिरवणूक काढण्यात आली. दुपारी बारा वाजल्यापासून तळगडावर दर्शनासाठी भाविकांची रिघ लागली होती महाशिवरात्रीचा उत्साह एवढा होता की भर उन्हातही नागरिक आपल्या लहान मुलांसह तळगड चढत होते. सायंकाळी चार वाजता महिला मंडळाचा हळदीकुंकू चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हळदीकुंकूला महिलांनी मोठया प्रमाणात गर्दी केली होती.





## वैजनाथ मंदिरात महाशिवरात्री साजरी

**माणगाव :** तालुक्यातील गांगवली येथील श्री वैजनाथ महादेव मंदिर हे देवस्थान फार प्राचीन आहे. शिवभक्तांचे श्रद्धास्थान म्हणून हे मंदिर सर्वत्र ओळखले जाते. जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून भावीक दर्शनासाठी या मंदिरात येत असतात. या मंदिरात दरवर्षीप्रमाणे या वर्षीही रविवारी (दि.१५) रोजी महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी करण्यात आली. माणगाव तालुक्यातील गांगवली येथील श्री वैजनाथ महादेव मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी करण्यात आली. पहाटे ५ ते ८ : ३० वाजता अभिषेक झाल्यावर भक्तगण दिवसभर मंदिरात दर्शनासाठी येत होते. हजारोंच्या संख्येने भक्तगणांची उपस्थिती होती. दुपारी १२ वा.आरती घेण्यात आली. सायंकाळी ६ नंतर रात्रभर भजन करण्यात आले. मंदिराचे विश्वस्त ज्ञानदेव दाखिणकर यांनी मंदिराच्या व्यवस्थापनाचे काम अगदी चोखपणे पार पाडले.



## भजनाने भाविक झाले मंत्रमुग्ध

**चिरनेर :** महाशिवरात्रीला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महत्त्वपूर्ण दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन, विंधणे येथील कातकरवाडी मार्गावर काही वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या शिव मंदिरात महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या भक्तीने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या भक्ती भावाने साजरा करण्यात आला. शिवरात्रीच्या निमित्ताने शिवभक्तांनी सकाळपासून अगदी दिवसभर शिव लिंगाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. यावेळी शिव मंदिरात बम-बम भोलेनाथचा नाद ऐकावयास मिळाला. याशिवाय दिवसभर भजनांचा सुर ऐकायला मिळाला. भजनाच्या कार्यक्रमात वेश्वी येथील भजनी बुवा विकास कडू यांनी भजनाच्या सुरावटीतून अभंग, ओव्या सादर करीत भाविकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना तबला साथ माही पाटील यांनी केली. रामदास पाटील, प्रमोद पाटील, गजानन जोशी, दत्तात्रेय, जीवन, कृष्णा, यशवंत, रोहिदास, दिनेश, दिलीप, यशवंत, सचिन यांनी साथ केली. यावेळी शिवभक्तांना प्रसाद म्हणून खजुराचे वाटप करण्यात आले. याशिवाय चिरनेर, कळंबुसरे या गावातील प्राचीन शिवमंदिरात महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात आला. शेकडो भाविकांनी दर्शनासाठी शिव मंदिरात गर्दी केली होती.

**महाशिवरात्रीनिमित्त ग्रामीण भागात भक्तीचा पूर**
**'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला**

# श्रीवर्धन तालुका झाला शिवमय

**। श्रीवर्धन । संदेश घोलप ।**

महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर रायगड जिल्हा अक्षरशः शिवमय झाला. श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यासह आगरवाडा, कोंडीवली, जावळे आणि हरिहरेश्वर, धारवली परिसरातील शिवमंदिरांत पहाटेपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. रुद्राभिषेक, महाआरती, भजन-कीर्तन आणि महाप्रसादाच्या आयोजनामुळे सर्वत्र भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले. 'हर हर महादेव'च्या गजराने आसमंत दुमदुमून गेला होता.

खररसई-आगरवाडा ग्रामस्थ मंडळाच्या पुढाकारातून श्री सोमेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार पूर्ण करून प्राणप्रतिष्ठापना सोहळा शास्त्रोक्त पद्धतीने पार पडला.



**क्रीडा स्पर्धा व भव्य महाप्रसाद**

मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. गावकरी व भाविकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

आडी वरचीवाडी व कोंडीवलीत भक्तीची पर्वणी आडी वरचीवाडी: स्वयंभू मंदिरात अभिषेक, पालखी मिरवणूक आणि महिलांच्या हळदीकुंकू कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. रात्रीच्या महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली. कोंडीवलीत ओंकार ग्रामस्थ मंडळ व सरस्वती महिला मंडळ यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात शिवपूजन, आरती व सत्कार समारंभ पार पडले. दैवत पाटील यांच्या कीर्तनाने वातावरण भक्तीमय झाले.

**विशेष आकर्षण**

पहाटे अभिषेक व रुद्रपाठ, कळसपूजन व कलशारोहण सोहळा शेकडो भाविकांसाठी महाप्रसाद ग्रामस्थांच्या देणग्या व श्रमदानातून मंदिराचा कायापालट साध्य झाला असून भाविकांसाठी मंदिर खुले करण्यात आले आहे.

**प्रमुख देवस्थानांत भाविकांची मांदियाळी**

दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या हरी हरेश्वर येथे व धारवली येथील धारेश्वर तसेच श्रीवर्धन जीवन बंदर जिवनेश्वर मंदिर आणि देवखोल येथील परिसरात पहाटेपासूनच भाविकांची गर्दी उसळली होती. दिवसभर रुद्राभिषेक, महाआरती व नामस्मरणाने परिसर भारून गेला होता.

**सामाजिक एकात्मतेचा संदेश**

महाशिवरात्रीच्या निमित्ताने केवळ धार्मिक विधीच नव्हे, तर ग्रामस्थ, महिला मंडळे, युवक मंडळे आणि स्वयंसेवक यांच्या सक्रिय सहभागातून सामाजिक एकात्मतेचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. ग्रामीण भागात या निमित्ताने सांस्कृतिक नवचैतन्य निर्माण झाले असून परंपरा आणि श्रद्धेचा संगम अधिक दृढ झाला आहे. रायगड जिल्ह्यातील ही महाशिवरात्री भक्ती, उत्साह आणि सामाजिक ऐक्याची अविस्मरणीय पर्वणी ठरली.

'हर हर महादेव'च्या अखंड जयघोषात श्रीवर्धन तालुका शिवमय झाल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले.

# निवडक

## एकदरा पुलाच्या कामाला सुरुवात



**आगरदांडा :** मुरुडला जोडणाऱ्या एकदरा पुलाला ६२ वर्षांपेक्षा जास्त वर्ष झाली आहेत. वाढत्या रहदारीला भार सोसणाऱ्या आणि अत्यंत महत्त्वाचा असलेला पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला पुन्हा सुरुवात झाली आहे. एकदरा पुल ६२ वर्षांपासून दुरुस्ती न झाल्याने या पुलावरचे सुरक्षित कठडे व बेरींग पुर्णतः खराब झाल्याने हा पुल धोकादायक बनला होता. या पुलावरून एकदरा, माझेरी, राजपुरी, खोरा, डोंगरी या गावातील सर्व ग्रामस्थ रोजच्या रोज या पुलावरून मुरुड शहराकडे रोज ये-जा करित असतात. पुलाची दुरुस्ती होत नसल्याने ग्रामस्थांसह पर्यटकांनी नाराजी दर्शवली होती. यांची दखल राज्य सरकारने घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत या पुलाच्या दुरुस्ती करिता चार करोड रुपये मंजुर करुन हे काम ठाणे येथील संरचना या कंपनीला देण्यात आले होते. या कामाला २० जानेवारी २०२४ पासुन सुरुवात झाली होती. परंतु झालेला कामाचा बील ठकीत आसल्याने हे काम २० ऑक्टोबर २०२४ पासुन हे बंद होते. आज पुन्हा ठेकेदारांनी पुलाच्या कामाला सुरुवात केल्याने जनतेनी निःश्वास सोडला.

## हरविलेला मोबाईल सापडला



**तळा :** तळे तालुक्यातील मेढे येथील रहिवासी दत्तात्रेय लक्ष्मण कांबळे हे आपल्या तहसीलच्या कामानिमित्त शुक्रवारी(दि.१३) फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालयात आले होते. कामाच्या गडबडीत त्यांचा मोबाईल तहसील आवारात हरविला आहे अशी तक्रार तळा पोलीस स्टेशन येथे केली. तक्रारीची दखल घेत तळा पोलीस स्टेशनचे ए. पी. आय गवई यांचे मार्गदर्शना खाली फौजदार पाटील व पोलीस कर्मचारी साळुंखे यांनी तपासाला सुरुवात केली असता कांबळे यांचा मोबाईल महसूल आवारांत सापडला. सदरचा मोबाईल तक्रारदार दत्तात्रेय कांबळे यांना फौजदार पाटील व पोलीस कर्मचारी साळुंखे यांनी ताब्यात दिला आहे. हरवलेला मोबाईल त्वरित पोलीस यंत्रणेने कांबळे यांना मिळवून दिल्याबद्दलकांबळे यांनी एपीआय गवई फौजदार पाटील पोलीस कर्मचारी साळुंखे यांचे आभार मानले असून कर्तव्यात दक्ष असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचे शहरांत कौतुक होत आहे.



## श्रमसंस्कार शिबिरातून समाजसेवा

**नवीन पनवेल :** कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, पनवेलच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराने समाजसेवेचा अनोखा आदर्श उभा केला. ८ ते १४ फेब्रुवारी दरम्यान शांतीवन येथे हे शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरामध्ये स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, जनजागृती कार्यक्रम, पथनाट्य, शैक्षणिक मदत, तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. स्वयंसेवकांनी ग्रामस्थांसोबत संवाद साधत सामाजिक जबाबदारीची जाणीव दृढ केली. शिबिराचे उद्घाटन डॉ. शिवदास कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. कल्पेश भोईर, प्रा. मयुरी, उमरोली गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि शांतीवन संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. शिबिराचा समारोप शनिवारी(दि.१४) रोजी प्रा. प्रशांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. उपक्रमाचे नियोजन प्रा. चंद्रकांत मुकादम यांनी केले. प्रा. के. डी. शारा, प्रा. अंजू सोंखला आणि इतर प्राध्यापकांनी शिबिराला भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृती ठाकूर हिने केले, तर संतोष मुखर्जी यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

## मजगावला वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**अलिबाग :** मजगावच्या शिवप्रेमी मित्र मंडळातर्फे तारखेनुसार शिवजयंतीच्या निमित्ताने शिवरायांचे आचार, विचार, युद्धनीती, त्यांनी प्रजेच्या हितासाठी घेतलेले अनोखे प्रशासकिय निर्णय प्रत्येक शिवप्रेमींपर्यंत जावेत, त्यातून त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून १९ फेब्रुवारी शिवजयंतीचे औचित्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अधिकमाहिती व नाव नोंदणीसाठी आशिष बुल्लू मो.क्र. ८२३७२७५६६८,समीर माळी-८२३७७०२५९५ शनिकेत भोईर ८९८३०९२०४८ नाथाभाऊ गिरणेकर, ९२२५५८७८४४ योगेश घरत ९०४९६९२५०० यांच्याशी संपर्क साधावा.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- ग्राफिक डिझाईन, सोशल मीडिया हॅंडिन साठी अनुभवी मुलगी पाहिजे. मो.९९२१०७३९६३
- ''आयुर्वेद वेलनेस'' डायरेक्ट सेलिंग प्रोडक्ट्च्या, मार्केटिंगसाठी सेल्समन/सेल्सगर्ल्स पाहिजेत. अॅन्ड्रॉईट मोबाईल आणि बाईक असणे आवश्यक. एरिया-अलिबाग, मुरूड, पेण, रोहा, नागोठणे, कोलाड, टिप-शिक्षणाची-वयाची अट नाही, पार्टटाईम किंवा फुलटाईम मार्केटिंग करू शकता. संपर्क- ८००७१९०३५२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# नऊ ग्रामपंचायतीची मुदत संपली

## ●प्रशासकांची संख्या पोहचली ३९ वर ●२०२१ मध्ये झाल्या होत्या निवडणुका




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतीच्या सदस्य मंडळाची मुदत संपली असून तेथे आता प्रशासक राजवट आली आहे. तालुक्यातील ३० ग्रामपंचायतीमध्ये यापूर्वी प्रशासक राजवट आहे आणि आता आणखी नऊ ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक आले असल्याने तालुक्यात मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीची संख्या ३९ वर पोहचली आहे.

तालुक्यातील कोरोना काळात जानेवारी २०२१ मध्ये निवडणुका झालेल्या ग्रामपंचायतीमधील सदसय मंडळाची पाच वर्षांची मुदत फेब्रुवारी महिन्यात संपली आहे.जानेवारी २०२१ मध्ये सार्वत्रिक निवडणुका झालेल्या तालुक्यातील कोल्हारे, दामत, पोशीर, साळोखतर्फे वरेडी, कडाव, हुमगांव, वैजनाथ, भिवपुरी आणि जिते अशा नऊ ग्रामपंचायती यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळाचा शेवटचा दिवस नऊ फेब्रुवारी रोजी होता. या दिवशी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुकीचा निकाल असल्याने मुदत संपणारे बहुसंख्य ग्रामपंचायत कार्यालये शेवटच्या दिवशी ओस होते. या सर्व नऊ ग्रामपंचायतीचा कारभार चालवण्यासाठी रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्रशासक नेमण्यात आले आहेत. कर्जत तालुक्यात ५५ ग्रामपंचायतीपैकी २०२४ मध्ये पहिल्या टप्प्यात फेब्रुवारी २०२४ ते मे २०२४ या कालावधीत २० ग्रामपंचायती यांच्या सदस्य मंडळाची मुदत संपली आहे. त्यानंतर १० डिसेंबर २०२४ पर्यंत तालुक्यातील आणखी ११ ग्रामपंचायती यांच्या सदस्य मंडळाची मुदत संपली आहे.

तालुक्यातील ३० ग्रामपंचायती मध्ये२०२५ सुरु होण्याआधी सदस्य मंडळ अस्तित्वात नाही.

### मुदत संपलेल्या ग्रामपंचायती

कशेळे, मोग्रज, माणगावतर्फे वरेडी, सावेळे, वारे, किरवली, बोरिवली, शेलू, पाषाणे, मानिवली, हालिवली, आसल, खांडपे, शिरसे, ममदापुर, पळसदरी, सावळा हेदवली, पिंपळोली, बीड बुद्रुक,अंजप, रजपे, जामरुंग, चिंचवली, वदप, वरईतर्फे नीड, तिवरे, वाकस, उमरोली, कोल्हारे, दामत, पोशीर, साळोखतर्फे वरेडी, कडाव, हुमगांव, वैजनाथ, भिवपुरी, जिते.

सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदत संपलेल्या २५ ग्रामपंचायत मध्ये शासनाने प्रशासक यांच्या हाती कारभार दिला आहे.

कर्जत तालुक्यातील कशेळे, मोग्रज, माणगावतर्फे वरेडी, सावेळे, वारे, किरवली, बोरिवली, शेलू, पाषाणे, मानिवली, हालिवली, आसल, खांडपे, शिरसे, ममदापुर, पळसदरी, सावळा, हेदवली, पिंपळोली, बीड बुद्रुक, अंजप, रजपे, जामरुंग, चिंचवली अशा २५ ग्रामपंचायतीमध्ये २०२४ पासून प्रशासक राजवट आहे तर वदप, वरईतर्फे नीड, तिवरे, वाकस, उमरोली असा सहा ग्रामपंचायतमध्ये देखील सदस्य मंडळ यांची मुदत संपल्याने २०२५ पासून त्या ठिकाणी प्रशासक राजवट आहे. तर आता कोल्हारे, दामत, पोशीर, साळोखतर्फे वरेडी, कडाव, हुमगांव, वैजनाथ, भिवपुरी आणि जिते या ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक राजवट आली आहे.

## अंनिस कर्जत शाखेची कार्यकारिणी जाहीर

**। कर्जत । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कर्जत शाखेची कार्यकारिणी निवड पार पडली. यावेळी अध्यक्षपदी विलास सांगळे, उपाध्यक्षपदी अनिल थोरवे तर शाखा कार्याध्यक्षपदी सूर्यकांत भुतावळे यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कर्जतच्या निवड संबंधी कोतवाल नगरमध्ये सभेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा कार्याध्यक्ष संदीप गायकवाड यांनी अंनिसची त्रिस्तरीय संघटनात्मक रचना स्पष्ट केली. शाखा कार्यकारिणी दरवर्षी, जिल्हा कार्यकारिणी दोन वर्षांनी आणि राज्य कार्यकारिणी तीन वर्षांनी बदलते. अशी माहिती दिली. तसेच अंनिसची पंचसूत्री मांडून संस्था या तत्त्वांवरच कार्य करते, असे त्यांनी नमूद केले. प्रधान सचिवपदी विकास वाल्हे, महिला सहभाग विभाग प्रमुखपदी शितल गायकवाड, युवा सहभाग विभाग प्रमुखपदी अविनाश दोंदे, विविध उपक्रम विभाग प्रमुखपदी गणेश गंगावणे, सोशल मीडिया विभाग प्रमुखपदी रोहिदास लोभी तर कायदेविषयक विभाग प्रमुखपदी ॲड. उज्वला पाटील यांची निवड झाली. विजय कोंडिलकर तसेच श्रीकांत हावरे हे सदस्य म्हणून कार्यरत राहणार आहेत. या बैठकीस प्रल्हाद बोऱ्हाडे तसेच महिला सहभाग विभागाच्या शोभा बोऱ्हाडे यांचीही उपस्थिती लाभली.

## 'बालरुग्ण सुपर स्पेशालिस्ट' शिबीर

**बोर्ली पंचतन :** ग्रामीण भागातील बालकांच्या आरोग्य समस्यांकडे लक्ष देत त्यांना तज्ज्ञ उपचारांची संधी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. राजेश पाचारकर मित्र फाऊंडेशनतर्फे भव्य बालरुग्ण सुपर स्पेशालिस्ट किमान खर्चात शक्य असल्यास मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीर रविवारी, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्राथमिक आरोग्य केंद्र, बोर्ली पंचतन येथे पार पडणार आहे. डॉ. राजेश पाचारकर मित्र फाऊंडेशन, सह्याद्री महिला ग्रामसंघ, बोर्ली पंचतन आदीच्या सहकार्याने शिबिराचे आयोजन केल आहे.

## पनवेल पालिकेवर ठिय्या आंदोलन

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी।**

महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत प्रहार आणि विविध सामाजिक संघटना यांनी वेळोवेळी पालिका आयुक्त यांना निवेदन देत नागरी समस्या सोडवण्याची मागणी केली होती होती, परंतु पालिका प्रशासनाकडून याबाबत ठोस उपाययोजना न झाल्याने पालिकेला आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यात सार्वजनिक सुविधायुक्त रुग्णालय, सार्वजनिक परिवहन सेवा सुरू करणे, आदिवासी वाघ्याचीवाडी इथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, हवा प्रदूषण करणाऱ्या विकासकांवर कारवाई करणे, कंट्राटी कामगारांना सर्व सुविधा देणे, अनाधिकृत आणि बेकायदेशीर फेरीवाले यांच्यावर कारवाई करणे आदी मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्ष, अन्याय अत्याचार निर्मूलन समिती, आदिवासी विकास परिषद आणि भीमशक्ती संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने नागरी प्रश्ना संदर्भात आंदोलन करण्याच्या इशारा देण्यात आला आहे अशी माहिती सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड यांनी दिली आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

## नामयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**नागोठणे :** श्री संत सेवा मंडळाच्या वतीने येथील श्री ज्ञानेश्वर मंदिरात शुक्रवारी दि. २० ते सोमवार २३ फेब्रुवारी या कालावधीत अखंड नामयज्ञ सोहळ्या अंतर्गत प्रवचन, कीर्तनाच्या कार्यक्रमासह इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण होणार आहे. सोहळ्याचे नियोजनबद्ध आयोजन श्रीसंत सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. त्यामुळे नागोठणे नगरीत चार दिवस हरीनामाचा गजर दुमदुमणार असल्याचे पहावयास मिळणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताहात दररोज सकाळी ४ ते ६ वा. काकड आरती, सकाळी ८.३० ते १२.३० आणि दुपारी २ ते ४.३० या दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण होणार आहे. सायं. ५ ते ६ या वेळेत प्रवचन, सायंकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत हरिपाठ तर रात्री ७ ते ९.३० वा. दरम्यान कीर्तन झाल्यानंतर भजन, जागर अशा विविध धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे. अखंड नामयज्ञ सोहळ्याच्या निमित्ताने हरीनाम गजरात दिंडी सोहळा संपन्न होणार आहे. यावर्षी अखंड नामयज्ञ सोहळ्याचे हे ५३ वे वर्ष आहे. कार्यक्रम संपन्न होण्यासाठी श्रीसंत सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ मेहनत घेत आहेत.

## पालीत मोफत आरोग्य शिबीर

**। पाली । प्रतिनिधी ।**




सामाजिक बांधिलकीची जपणूक करत एसआयग्रुप इंडिया प्रायव्हेट लिमिटेड रासळ, रोटरी क्लब लोटे व श्री बल्लाळेश्वर देवस्थान पाली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० ते ११ फेब्रुवारी रोजी श्री बल्लाळेश्वर देवस्थान भक्त निवास क्रमांक १ येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य मार्गदर्शन करण्यात आले. मोतीबिंदू व नेत्र तपासणी, तसेच गरजूंना मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. ३०० लाभार्थ्यांनी या मोफत सुविधांचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटन सुधागड-पालीचे नायब तहसीलदार नकुल पोलेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रणिता खाडे, दुर्गा दळवी, जितेंद्र गद्रे, वैभव आपटे, सचिन अणेराव, राजेंद्र महाडिक, उपेंद्र कानडे, संदीप सुर्वे आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गंगाराम परुळेकर, किरण दुर्गे, नितीन बोथरे तसेच रोटरी क्लब लोटे व श्री बल्लाळेश्वर देवस्थान यांनी सहकार्य केले.

## नवघर शाळेत जनजागृती

**पाली/बेणसे :** नवघर शाळेमध्ये लेक शिकवा अभियानांतर्गत माता-पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. स्त्री शिक्षणाचा संदेश आणि सामाजिक विषयांवर आधारित सुंदर रांगोळ्यांनी शाळेचे अंगण सजले होते. स्पर्धेच्या माध्यमातून पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करत लेक वाचवा, लेक शिकवा हा संदेश घराघरात पोहोचवला. बालविवाह रोखण्यासाठी जोशी काकू यांनी उपस्थित माता आणि मुलींना मोलाचे मार्गदर्शन केले.

## श्रीवर्धन आगाराची लालपरी धिम्यागतीने

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन आगाराकडून लांब पल्लयाच्या व मध्यम लांब पल्लयाच्या मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यातील खासगी बसेस सोडण्यात येत आहेत. परंतु, या मार्गावर नादुरुस्त बसेस देण्यात येत असल्याने प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागतोय.

श्रीवर्धन आगाराची कोलमांडला श्रीवर्धन मुंबई ही भाडे तत्वावरील खासगी बस सकाळी सव्वा अकरा वाजता मार्गस्थ होते. रविवारी (दि.१५) रोजी सदरची बस ( एम एच ०६ बी डब्ल्यु ८४५८ ) ही नियोजित वेळेपेक्षा सव्वा तासाने मुंबई कडे मार्गस्थ झाली. साडेबारा दरम्यान श्रीवर्धन स्थानकातून सुटलेली बस अत्यंत धीम्या गतीने तसेच नागोठणे ते खारपाडा दरम्यानचे सर्व थांबे घेत असल्याने प्रवासी वर्गाला नाहक त्रासाला सामोरे जावे लागले.प्रवासी वर्गाने चालकास धीम्या गतीने बस चालवण्याचे कारण विचारले असता, बसमध्ये काही तरी बिघाड झाला असेल असे उत्तर दिले.




श्रीवर्धन आगारातून लांब पल्लयाच्या मार्गस्थ होणाऱ्या खासगी बसेस ची नियमित तपासणी होते की नाही.तसेच मुंबईकडे जाणाऱ्या व येणाऱ्या बसेसना नागोठणे ते खारपाडा दरम्यानचे इतके थांबे कोणाच्या आदेशावरून देण्यात आले आहेत असा प्रश्न प्रवासी वर्गाने उपस्थित केला.

> **बस वेग घेत नव्हती. त्यातही अनेक थांबे यामुळे आम्हाला त्रास सहन करावा लागला. आगारात नादुरुस्त बसेसकडे लक्ष द्यावे तसेच नागोठणे ते खारपाडामधील सर्व थांबे रद्द करण्यात यावेत. प्रवासी वर्गाला जलद बसेसचे तिकीट घेऊन कंटाळवाणा प्रवास करावा लागतोय.**
> **- गणेश पोलेकर. श्रीवर्धन.**



## आगरी संस्थेचा सामाजिक उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी।**

श्रीक्षेत्र भुवनेश्वर येथे रविवारी (दि.१५) फेब्रुवारी रोजी सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी कार्याचा प्रसार व प्रचार करण्यासाठी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आगरी समाज संस्थेच्या वतीने दीपक पाटील व नरेंद्र पाटील यांचा सन्मान करण्यात आला. उपक्रमासाठी सचिन पाटील, जयवंत पाटील, शशिकांत मिठागरी,मनोहर पाटील, अद्वैत पाटील, राजेंद्र पाटील, राजेश म्हात्रे, प्रभाकर ठाकूर, सुनील तांबडकर, मिलिंद पाटील, उदय म्हात्रे, अनंत म्हात्रे, वैभव पाटील, नंदकुमार पाटील, मिलिंद धोदरे, अभिजित पाटील, डॉ. जगन्नाथ पाटील, तुषार थळे, सुप्रिया ठाकूर, रेश्मा म्हात्रे, दिप्ती पाटील, तृप्ती म्हात्रे, दिपश्री पाटील यांनी परिश्रम घेतले.


## दिवे लवकर सुरू करण्याची मागणी | वाहतुकीसाठी प्रकाश व्यवस्था आवश्यक

# रामवाडी ब्रिजवर अंधाराचे साम्राज्य

**। खरोशी, । प्रतिनिधी ।**

मुंबई गोवा महामार्गावरील NH-६६ वरील रामवाडी पेण ब्रिज तसेच हमरापुर, तरणखोप, जिते रामवाडी परिसरातील अनेक महिन्यांपासून बंद असलेल्या महामार्गावरील विद्युत दिव्यांबाबत इंजि. जीवन शंकर पाटील यांनी सातत्याने मागणी करून सदर महामार्गावरील पथदिवे लवकरात लवकर चालू करावे अशी मागणी केली आहे.

याबाबत (दि. ८) डिसेंबर २०२५ रोजी नॅशनल हायवे अथॉरिटी, पनवेल यांना अधिकृत ई-मेलद्वारे या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यात आले होते. ई-मेल व्यतिरिक्त फेसबुक व ट्विटर (द) या सोशल



मीडिया वरूनही वारंवार संबंधित विभागाकडे तक्रारी व पाठपुरावा करण्यात आला.

विशेष म्हणजे विभागाने ई-मेल प्राप्त झाल्याचे मान्य केले असले तरी कोणताही लेखी प्रतिसाद देण्यात आलेला नव्हता.

दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी रामवाडी-पेण ब्रिजवरील काही दिवे सुरू करण्यात आले; मात्र समस्या पूर्णपणे निकाली न लागल्याने पाठपुरावा अखंड सुरू ठेवण्यात आला. महामार्गावरील अंधार हा नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करणारा मुद्दा आहे. अपघात टाळण्यासाठी व सुरक्षित वाहतुकीसाठी प्रकाश व्यवस्था नियमित व कायमस्वरूपी सुरू राहणे अत्यावश्यक आहे. जीवन पाटील यांनी प्रशासनाचे आभार मानत सांगितले की, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा सर्वोच्च प्राधान्याचा असावा. दिलेले आश्वासन वेळेत पूर्ण व्हावे आणि भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, हीच अपेक्षा.

> **मीटर कनेक्शन संदर्भातील तांत्रिक अडचणीमुळे दिवे बंद आहेत. संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची प्रक्रिया सुरू असून फेब्रुवारी अखेरीस रामवाडी-पेण ब्रिजपुरतेच नव्हे तर हमरापुर, तरणखोप जिते-रामवाडी परिसरासह संबंधित राष्ट्रीय महामार्गावरील सर्व विद्युत दिवे पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात येतील.**
> **- निखिल कुमार उपअभियंता, पीडब्ल्यूडी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-कळंब, ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पा | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| असलम हसन टिवाळे | ९६ | ३ | ०-३१-४० | ५.८० |
| | ९६ | १ | ०-२९-३० | ५.०० |
| | ९७ | ५ | ०-१७-२० | २.१२ |
| | ९७ | ३ | ०-३०-० | ०.३३ |

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून एकविस (२१) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**ॲड.अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहिर नोटीस

नि:७/ड

**माणगाव येथील मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर सो. यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज नं. १६/२०२६

श्री. पथिक श्रीकांत शाह, अर्जदार
वगैरे ३

विरुद्ध

कोणीही नाही

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१) कै. जिनीशा पठीक उर्फ पथिक शाह ही अलका बिल्डिंग, फ्लॅट नं. १९, ३ रा मजला, ४०, बी- रोड, चर्चगेट, मरीन लाईन्स, मुंबई, महाराष्ट्र - ४०००२० येथे वास्तव्यास होती. कै. जिनीशा पठीक उर्फ पथिक शाह ही दि. २४-१२-२०२२ रोजी मयत झाली आहे. कै. जिनीशा पठीक उर्फ पथिक शाह हिचे नावे खालील नमुद मिळकती आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे - पडवण, ता. तळा, जि. रायगड**

| अनु क्र. | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| १ | ९१ | ०-३९-०० | ०.१२ |
| २ | ९७ | ०-३४-९० | ३.०० |
| ३ | ९९ | ९-८२-०० | ०.५० |
| ४ | १०० | ०-३६-०० | ०.०६ |
| ५ | १३६ | ०-७२-०० | ०.२५ |
| ६ | १४४ | १-००-०० | ०.१६ |
| ७ | १५१ | २-१५-०० | ०.५० |
| ८ | ५५४ | १७-७२-००<br>पैकी २-३१-०० | ६.६९<br>०.९५ |

सदर मिळकत मधील अविभाज्य हिस्सा

**मौजे म्हसाडी, ता. तळा, जि. रायगड**

| अनु क्र. | जुना गट नं. (मौजे-पडवण) | नविन गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | १७० | १ | १-०६-०० | ०.६९ |
| २ | १६४ | १० | ०-८४-०० | ०.३१ |

सदरहु मिळकती मधिल अविभाज्य हिस्सा

कै. जिनीशा पठीक उर्फ पथिक शाह हिस अर्जदार नं. १ हे पती व अर्जदार नं. २ व ३ ही आपत्य यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही.

२) कै. जिनीशा पठीक उर्फ पथिक शाह यांस वरील अर्जदार नं. १ हे पती व अर्जदार नं. २ व ३ ही आपत्य हेच कायदेशीर वारस असून अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. सबब अर्जदार यांनी कै. जिनीशा पठीक उर्फ पथिक शाह यांचे वारस असल्याचे ठरवुन मिळणेकामी मा. माणगाव दिवाणी व फौजदारी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

३) अर्जदार नं. १ ते ३ यांस कै. जिनीशा पठीक उर्फ पथिक शाह हिचे वारस असल्याचा दाखला देणेबाबत कुणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीमध्ये मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर माणगाव यांचे न्यायालयात लेखी स्वरूपात कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचेही हरकत न आल्यास अर्जदार यांनी दाखल केलेले अर्जास कोणाचीही हरकत नाही असे समजुन मा. न्यायालय अर्जदार यांस ती कै. जिनीशा पठीक उर्फ पथिक शाह हिचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मंजुर करेल व मागाहून आलेल्या हरकती मा. न्यायालयावर बंधनकारक राहणार नाही.

माणगाव — **कोर्टाचा गोल शिक्का**
दिनांक :- १३/०२/२०२६

सही/- **लिपिक** **दि. न्यायाधिश व. स्तर माणगाव** **ता. माणगाव, जि. रायगड**

सही/- **अधिक्षक** **दि. न्यायाधिश व.स्तर माणगाव** **ता. माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक १) श्री. विठ्ठल रावजी संडवी वगैरे ३ रा. मोरेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे बांगरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| १७/१/ड | एकूण क्षेत्र २-०१-०० यापैकी विकत दिलेले क्षेत्र ०-८०-०० | १-७५ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण: कर्जत
दिनांक: १७/०२/२०२६

सही/-
**ॲड. गीतांजली जी फुलावरे.**
कार्यालय पत्ता: ''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं.३
कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८८८८०४५३७६/८६००३५२९८२

## आरोग्य सेवा

**राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा रुग्णालय रायगड-अलिबाग**

ईमेल आयडी-flc.raigad@gmail.com

जा.क्र.जिसारु/एनएचएम/९८८/२०२५-२६
जिल्हा रुग्णालय, रायगड अलिबाग
दिनांक - १३/०२/२०२६

उपरोक्त विषयाच्या अनुशंगाने जिल्हा रुग्णालय अलिबाग अंतर्गत उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालय करीता Dialysis Machine, Euipment & Instrument, खरेदी करणेकरिता प्रस्तावित आहे. तरी सदर Dialysis Machine, Euipment & Instrument, चा पुरवठा करु इच्छित असणाऱ्या निविदा धारकांनी ई निविदा पद्धतीने निविदा सादर करावी. Website:- http://mahatenders.gov.in वर सर्व माहिती उपलब्ध आहे. प्रस्तुत निविदेबाबतचे आवश्यक फॉर्म ई-निविदा प्रणालीद्वारे डाऊन लोड करणे, सादर करणे इ. बाबतचे वेळापत्रक खालील प्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| ई.निविदा प्रकाशित करण्याचा दिनांक | दि.१४/०२/२०२६ पासुन सायंकाळी ५.०० वाजता |
| निविदा विक्री व डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि. १४/०२/२०२६ ते दि. २६/०२/२०२६ |
| निविदा बंदची तारिख | दि.२६/०२/२०२६ सायंकाळी ५.०० वाजता |
| निविदा पूर्व सभा | दि.१८/०२/२०२६ सकाळी १०.०० वाजता |
| निविदा उघडण्याची तारिख | दि.०२/०३/२०२६ सकाळी १०.०० वाजता |

निविदा पुर्व सभेचे ठिकाण - जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय अलिबाग रायगड यांचे दालन

सही/-
**जिल्हा शल्यचिकित्सक**
**जिल्हा रुग्णालय, रायगड अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री. राजेंद्र कमलाकांत चोदनकर रा. फ्लॅट नं आय ७०२, गोल्डन स्क्वेर सीएचएस ऑफ सीएसटी रोड कलीना सांताक्रुझ ईस्ट मुंबई विद्यानगरी ४०००९८ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. ग्रामदेव वहीवाटदार तर्फे कुसूम नाना मोरे रा. दहिगाव ता. कर्जत जि रायगड यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या. मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे. मिळकतीचे वर्णन

**मौजे दहिगाव तालुका. कर्जत जिल्हा. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| २७ | ९ | ०-१८-०० | ०.१० |
| ३३ | ३ | ०-०६-४० | ०.५० |
| ३३ | ६ | ०-०६-१० | ०.६० |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिल विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल साठेकरार पुर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

अशिला तर्फे ॲडव्होकेट
दिनांक : १७/०२/२०२६

**ॲड. हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा युको बँक शेजारी कर्जत ता कर्जत जि. रायगड
८९७६३७५५७०

**कोकण मर्कंटाईल को- ऑप. बँक लिमिटेड** मल्टी स्टेट बँक — Since 1973
**नोंदणीकृत कार्यालय:** १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई ४०००१०.
दूरध्वनी : २३७२३७५३, २३७२९९६९, २३७२९९७०, २३७२९९७१, २३७३४२०२, २३७३४३११.
फॅक्स: २३७४८५८९ | वेबसाईट : www.kokanbank.net

## ताबा सूचना

ज्याअर्थी कोकण मर्कंटाईल को- ऑप. बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार **१) श्रीमती सबा बशीर अहमद - कर्जदार/गहाणवटदार, २) श्री. खोत हसनमियाँ सुलेमान - सह-कर्जदार/गहाणवटदार, ३) श्री. हमदुलाय झुबेर मोह. सलीम - जामीनदार, ४) श्री. हमदुलाय मोहम्मद हुसैन मोईनुद्दिन - जामीनदार , ५) सौय हमदुलाय अफशा आरिफ - जामीनदार** यांना दि. ०२.१२.२०२५ रोजी मागणी सूचना जारी करून कर्ज खाते क्र. ७०६१/०७ करिता दि. ०२.१२.२०२५ रोजी नुसार **रु. २८,५८,२४३.५८ (रुपये अठ्ठावीस लाख अठ्ठावन्न हजार दोनशे त्रेचाळीस व पैसे अठ्ठावन्न मात्र)** व त्यावरील १०% प्रति वर्ष दराने पुढील व्याज आणि इतर प्रभार सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार, सह-कर्जदार, गहाणवटदार, जामीनदार सदर रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार, सह-कर्जदार, गहाणवटदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियमनांच्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा दि. १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार, गहाणवटदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार हा कर्ज खाते क्र. ७०३२/३ आणि १८३६/२ करिता दि. १०.०१.२०२५ रोजी नुसार **रु. २९,१७,४००.५८ (रुपये एकोणतीस लाख सतरा हजार चारशे व पैसे अठ्ठावन्न मात्र)** व त्यावरील १०% प्रति वर्ष दराने पुढील व्याज आणि इतर प्रभार एवढ्या प्रभारास अधीन असेल.

**मालमत्तेचा तपशील**

नवी मुंबईच्या १२.५% (पूर्वीची गावठण विस्तार योजना) च्या गाव तळोजामधील भूखंड क्र. ७१, सेक्टर २३ धारण केलेल्या जमिनीवरील तळोजा (नवी मुंबई) येथे स्थित रॉयल युसरा हाईट्स या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. १०२, मोजमाप ४५.२७ चौ.मीटर्स रेरा कार्पेट क्षेत्रफळ + ७.३२८ चौ.मीटर्स संलग्न बाल्कनी क्षेत्र + २.२१० चौ.मी. स्लॅब क्षेत्र + २८.३९२ नॅट टेरेस क्षेत्र.

**नियम ८ (६) सह वाचावयाच्या सरफैसी कायदा २००२ अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना**

कर्जदार, गहाणवटदार, भागिदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, मागणी सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार रक्कम व त्यासह आजपर्यंतचे व्याज आणि सहाय्यक खर्च आजपासून ३० दिवसांच्या आत भरणा करावे, असे न केल्यास मालमत्ता विक्रीस ठेवली जाईल/विक्री करण्यात येईल आणि शिल्लक देणी, जर असल्यास, व्याज आणि शुल्कासह वसूल केली जाईल.

कोकण मर्कं. को- ऑप. बँक लि. करिता
ठिकाणः नवी मुंबई — सही/-
दिनांकः १७.०२.२०२६ — प्राधिकृत अधिकारी

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ. प्रगती पाटील (ठाकरे) यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. सतिश दत्तात्रय देशमुख यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४२ | ५ | ०-३८-१० | १-७६ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. १७/०२/२०२६.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

:- मिळकतीचे वर्णन-मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| श्रीम. मिनाक्षी भिमराज ठाकरे | ११२ | ५ | ०-४३-००<br>पो.ख. ०-०५-०० | ०-२८ |

वरील मिळकती या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.
दि. १७/०२/२०२६.

**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.- ९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.-९८५०७६७५६८

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

:- मिळकतीचे वर्णन-मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| श्री. पराग प्रकाश तेलवणे | १११ | ३ | ०-२६-१०<br>पो.ख. ०-०२-३० | १-३७ |

वरील मिळकती या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. १७/०२/२०२६.

**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.- ९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.-९८५०७६७५६८

## सार्वजनिक सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी भूखंड मालक कै.सुधाकर बामा पाटील(मयत) यांचे वारस(१) विठाबाई सुधाकर पाटील, (२)विशाल सुधाकर पाटील, (३) सुवर्णा मनोज गावंड यांच्याकडून खालील वर्णनाच्या भूखंडाचे हक्क कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर भूखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**भूखंडाचे वर्णन**

| Village | Khata No. | Gat No. | Hissa No. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| डोलवी दबाबा | २१० | ४६ | १/क/२ | ०.२०.२० | ०.०१.२० | ३.०० |
| | | | | **एकूण** | **०.२१.४०** | |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणाऱ्या भूखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/०२/२०२६

सही/-
**पॉल लीगल असोसिएट**
ऑफिस नंबर ३०१, तिसरा मजला,
ओम साई बिल्डिंग, प्लॉट नंबर १०१/३
स्वामी नित्यानंद रोड, गार्डन हॉटेल जवळ,
पनवेल, रायगड, ४१०२०६
Email: info@paullegalassociates.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राहुल वसंत म्हात्रे, रा. ६७-२, विठ्ठल मंदिर जवळ, ओवे गाव, खारघर, रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन विकसन कराराने विकसित करण्यासाठी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १६८ | ०.०४.८०<br>पो.ख. ०.०१.३० | ०.७८ | श्री. जॉन मॉथ्यूस, वगैरे एकुण ५. |
| | एकुण ०.०६.१० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या विकसन कराराचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १७/०२/२०२६.

सही / -
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो.नं. ७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. जनार्दन मारूती दळवी, रा. श्री बाल दिगंबर मंदिर जवळ, मु. पो. कडाव, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ५५/२७ | ०.२८.००<br>पो.ख. ०.०५.०० | ०.२० | श्री. राजेश मारूती भोईर |
| | एकुण ०.३३.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १७/०२/२०२६

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

## जाहीर निविदा

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता. माणगाव, जि. रायगड**

दिनांक १६/०२/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड १५वा वित्त आयोग सन २०२५-२०२६ अंतर्गत विकास कामाची निविदा खालीलप्रमाणे

| अ. क्र | कामाचे नाव/साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुठवली तर्फे तळे आ. वाडी प्राथमिक शाळा दुरुस्ती करणे व रंगरंगोटी करणे. | ५००००/- | २००/- | ५००/- | २४/०२/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | २५/०२/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| २ | मुठवली तर्फे तळे येथे शेतातील विहीर दुरुस्ती करणे. | ५७३५३/- | २००/- | ५७४/- | २४/०२/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | २५/०२/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ३ | निवी येथील नाला दुरुस्ती व साफसफाई करणे. | १०००००/- | २००/- | १०००/- | २४/०२/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | २५/०२/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ४ | निवी बापदेव मंदिराजवळील विहीर साफसफाई करणे. | ५३२२०/- | २००/- | ५३२/- | २४/०२/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | २५/०२/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ५ | मुठवली तर्फे तळे येथील अंतर्गत रस्ता/ दुरुस्ती करणे. | ५००००/- | २००/- | ५००/- | २४/०२/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | २५/०२/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ६ | उमरोली-दिवाळी येथील विजय शिंदे ते. संदिप दळवी यांच्या घरापर्यंत अंतर्गत रस्ता करणे. | ५००००/- | २००/- | ५००/- | २४/०२/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | २५/०२/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ७ | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणे. | १३५०००/- | २००/- | १३५०/- | २४/०२/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | २५/०२/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | ग्रामनिधी |

**अटी व शर्ती**

१. सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे, ता. माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही /- **ग्रामसेवक** **ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

सही/- **सरपंच** **ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे चेंढरे ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ. सुरेखा सुनिल पाटील यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ३२/१/अ/३ | ३-०८-० | ३०.८० |

या मिळकतीपैकी सौ. सुरेखा सुनिल पाटील यांचे मालकीचे १/२ म्हणजेच १-५४-० आर.चौ.मी.क्षेत्र

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- १४/०२/२०२६

**ॲड.(डॉ.) दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को.ऑप.हौ.सोसायटी, कामत आळी,
मु.पो. ता. अलिबाग, जि. रायगड.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**

ई निविदा सूचना क्रमांक ७७/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड व विळे-भागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरुस्ती....... विविध ठिकाणच्या व्हिटी पंप आणि व्हिएनसी पंपांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. (दुसरी मागणी) | ₹१९,९५,१२८.०० |
| २ | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती..... नागोठणे व पोयनाड येथील अशुद्ध व शुद्ध जलशुद्धिकरण केंद्रातील ३३५ एचपी व २७० एचपी स्क्रिरल केज इंडक्शन मोटर्सची तातडीची दुरुस्ती करणे. (दुसरी मागणी) | ₹१५,९६,१५५.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १७/०२/२०२६ ते दिनांक २६/०२/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १८/०२/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २०/०२/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत ही या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.आशीश विलास रणदिवे, विनया विलास रणदिवे व स्वप्नील विलास रणदिवे रा.मु.पो.अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत. या मिळकतीबाबत मालकीहक्काचा शोध घेण्याचे काम मजकडे सोपवण्यात आले आहे.

**-: मिळकतींचे वर्णनः-**

| मौजे | ग.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| सहाण | ५२ | - | ०-११-००<br>०-०२-००<br>०-१३-०० | २-५३ |

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीमधील आपले मालकी हक्क अबाधित आहे, तसेच सदर मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा श्री आशीश विलास रणदिवे, विनया विलास रणदिवे, व स्वप्नील विलास रणदिवे यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकती बाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर मागाहून येणारी कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहून आलेली अशी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक. १७/०२/२०२६

Cjayant Law Office करीता
**ॲड. जयंत हरेश्वर चेऊलकर**
२०१, सृष्टी, २ रा मजला,
वेधशाळेसमोर, अलिबाग, रायगड.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागि नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# विजयाने हुरळून जाण्यापेक्षा सावध रहा

विनायक दळवी

रविवारी कोलंबो मध्ये पाकिस्तान वर सहज मात करून भारताने २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर एट गटात सहज प्रवेश मिळवला. खरंतर असं म्हटलं जातं की भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना हाच अलीकडे आयसीसीच्या प्रत्येक वर्ल्ड कप स्पर्धेतील 'शोकेस' सामना असतो. भारत आणि पाकिस्तान या सामन्याबद्दल कमालीचे औत्सुक्य आणि दडपण देखील असतं. जागतिक क्रिकेटमधील क्रिकेट रसिक आणि अन्य देशांचे क्रिकेटपटू आणि संघ या लढतीची आतुरतेने वाट पाहत असतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील विश्वचषक स्पर्धांमधील लढती, मी जवळजवळ चार दशकाहून अधिक काळ 'कव्हर' करत आहे किंवा पाहत तरी आलो आहे. या कालावधीत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लढतीची जी झिंग होती किंवा खुमारी होती ती कमी झालेली पाहायला मिळते.

याचे प्रमुख कारण म्हणजे फाळणीपासून दोन्ही देशातील क्रिकेट हे वरच्या दर्जाचे राहिले आहे. मात्र अलीकडे म्हणजेच साधारण २००५ नंतर किंवा गेल्या दोन दशकांमध्ये विविध कारणांमुळे पाकिस्तानचा क्रिकेट स्तर बराच खालावला आहे. तेथील अस्थिर राजकीय परिस्थिती, क्रिकेटमधील आर्थिक दुर्बलता, आणि भारताबरोबर होणाऱ्या क्रिकेट मालिकांचा अभाव. यामुळे पाकिस्तान क्रिकेट पुढे तगडे आव्हान उभे राहिलेच नव्हते. त्यांचा कस नेहमीच भारताविरुद्ध खेळताना लागायचा. उभय देशांमधील क्रिकेट बऱ्याच अंशी कमी झाल्यामुळे आपण नेमके कुठे आहोत हे आजमावण्यात पाकिस्तानचे क्रिकेट कमी पडत होते. मला आठवतंय पाकिस्तान क्रिकेट याआधी सामन्यांचे विजय याबाबतीत संख्येमध्ये जरी अग्रेसर असला, तरीही भारताविरुद्धचे सामने अटीतटीने खेळले जायचे. त्यामध्ये जरी पाकिस्तानचा क्रिकेट संघ जिंकला, तरी देखील भारतीय संघाची कायम त्या सामन्यावर छाप पडलेली असायची. नव्वदच्या दशकानंतर तर विश्वचषक स्पर्धेत किंवा मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताने तगड्या पाकिस्तान संघांना देखील हरविले होते. मात्र त्या सामन्याच्या लढतीची झिंग वेगळीच असायची. त्या प्रत्येक विजयाच्या वेळी, भारतीयांना शारजांमध्ये चेतन शर्माच्या अखेरच्या चेंडूवर जावेद नियादाने मारलेला षटकार आठवायचा. आणि मग ते सारे विजय अधिक गोड वाटायचे. गेल्या दोन दशकात पाकिस्तान संघाच्या बाबतीत अशी परिस्थिती राहिली नाही. हा संघ कधीही स्थिरस्थावर असलेला संघ वाटत नाही. वेगवान गोलंदाजी हे त्यांची शक्तिस्थान होती. आणि दर्जेदार फिरकी गोलंदाज देखील पाकिस्तानच्या गोलंदाजीचा समतोल साधायचा. अलीकडच्या सर्वच पाकिस्तान संघांमध्ये असं अभावाने पाहायला मिळतं. खरंतर भारताचे फलंदाज आणि पाकिस्तानचे गोलंदाज यामधील धुमश्चक्री पाहण्यासाठी तमाम क्रिकेट रसिक आसुसलेले असायचे. कारण दोन्ही संघांकडे त्या त्या बिरादरीतील सर्वोत्तम खेळाडू होते. त्यामुळे क्रिकेट या खेळातील शिगेला पोहोचलेला संघर्ष भारत पाकिस्तान सामन्यात पाहायला मिळायचा.

गेल्या वीस पंचवीस वर्षात भारतीय क्रिकेट मात्र पाकिस्तान च्या क्रिकेट पेक्षा खूपच पुढे निघून गेलेले आहे. आयपीएल या स्पर्धेच्या आर्थिक यशानंतर जागतिक क्रिकेटच्या नाड्या भारताकडे आपोआपच आल्या.त्यायोगे जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम गुणवत्ता, प्रशिक्षण आणि सर्वोत्तम क्रिकेट स्टेडियम आणि सुविधा भारतामध्ये मोठ्या प्रमाणात दिसायला लागल्या. भारतीय क्रिकेट मधील सर्व स्तरांवरील क्रिकेटपटूंना चांगले आर्थिक मानधन देखील मिळायला लागले आणि त्याचा परिणाम म्हणून सर्वच वयोगटातील आणि स्तरावरील खेळाडू क्रिकेटमध्ये स्वतःला झोकून देताना पाहायला मिळाले. त्याचीच परिणीती म्हणून सर्वोत्तम गुणवत्ता भारताच्या क्रिकेटमध्ये दिसायला लागली. भारतापासून सतत दूर राहत, क्रिकेटच्या बाबतीत फारकत घेत व बहिष्कारचे अस्त्र वारंवार उपसून पाकिस्तान क्रिकेटने स्वतःच बरंच नुकसान करून घेतलं, जे सध्या मैदानावर परावर्तित झालेल आपल्याला दिसत आहे. याचीच परिणीती आपण अलिकडच्या भारत पाकिस्तान यांच्यातील सर्व सामान्यांमध्ये झालेली पाहतो. पाकिस्तान संघ फारच कमी वेळा भारतीय संघाला झुंज देताना पाहायला मिळतो. अगदी अटीतटीच्या, शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या लढती, ज्या याआधी पाकिस्तान जिंकत होता, त्या सर्व सामन्यांमध्ये भारत विजयी होताना दिसतोय. हा फरक दोन्ही देशातील क्रिकेटच्या 'स्ट्रक्चर' मुळे झालाय. तसेच त्याचा परिणाम दोन्ही देशांच्या क्रिकेटपटूंच्या मानसिकतेवर देखील झालेला स्पष्ट दिसत आहे. भारतीय संघ याआधी पाकिस्तानशी खेळताना काहीसा दडपणाखाली खेळतो असं वाटायचं. यावेळी नेमकं उलट चित्र आपण पाहतो. पाकिस्तानी खेळाडूच भारतासमोर खेळताना घाबरलेले, दडपणाखाली खेळताना दिसत असतात. त्याचाच परिणाम म्हणून भारतीय संघ सर्वात लढती सहज जिंकत आहे. कोलंबो मधील सामन्यात देखील पाकिस्तान संघ कोणतेही रणनीती आखून खेळतोय असं वाटतच नव्हतं त्यांची फलंदाजी देखील बेभरोश्याची वाटली आणि गोलंदाजीत योजनाबद्धता दिसली नाही. खरंतर भारतापुढे याआधी पाकिस्तानचा आणि श्रीलंका क्रिकेट संघात देखील आव्हान असायचा. मात्र आशिया खंडातील हे दोन्ही देश, तेथील आर्थिक, राजकीय, सामाजिक परिस्थिती बिघडल्यानंतर, क्रिकेटच्या स्तरावरही त्यांची अधोगती झाल्याची लक्षात येते.

त्यामुळे पूर्वीप्रमाणे भारतासमोर पाकिस्तान संघ मोठा आव्हानवीर नाही. यापुढे देखील काही काळ नसेल. तरी देखील २० षटकांचे क्रिकेट हे चमत्कारिक, लहरी आणि बेसावध क्षणी हातून निसटणारे आहे. त्यामुळे भारतीय संघाने बाद फेरींच्या सामन्यात अतिसावध राहून खेळ करण्याची गरज आहे. पाकिस्तान वरील विजयाने हुरळून जाण्यापेक्षा, भारताने आपले यापुढील प्रतिस्पर्धी कसे असतील, त्यांचे खेळाडू, त्यांचा खेळ याविरुद्ध व्यवहारचना व रणनीती आखणे गरजेचे आहे. २०२३ च्या विश्वचषक स्पर्धेत, अंतिम फेरीत झालेल्या चुकीची पुनरावृत्ती भारताने यावेळी टाळली पाहिजे. स्पर्धेतील सर्वच सामने सहज जिंकत जिंकत अंतिम फेरी गाठणारा भारतीय संघ नेमका विजेतेपदाच्या ट्रॉफीला हात लावण्याआधीच पराभूत झाला होता.

# भारताचा 'ईशान'दार विजय

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यामध्ये पार पडलेल्या विश्वचषकाच्या लीग सामन्यात भारताच्या संघाने आणखी एकदा पाकिस्तानी खेळाडूंना नेस्तानाभूत केले आहे. भारताच्या संघाने पहिल्या ओव्हरमध्ये विकेट गमावल्यानंतर ईशान किशनने खेळी सांभाळली पण जेव्हा पाकिस्तानच्या संघाने पहिले तीन ओव्हरमध्ये तीन विकेट गमावल्यानंतर त्यांचा खेळ मात्र कोणाला सांभाळता आला नाही. भारताच्या संघाने पाकिस्तानला ६१ धावांनी पराभूत केले आहे. भारताच्या संघाने या विजयासह सुपर ८ मध्ये प्रवेश केला आहे.



पाकिस्तानचे पहिले तीन फलंदाज दोन अंकी आकडा देखील पार करण्यात अपयशी ठरले. पाकिस्तानच्या क्रिकेट गोलंदाजांची सामन्याच्या आधी बरीच चर्चा झाली पण भारतीय फलंदाजांसमोर फार काही त्यांची चालली नाही. चर्चेत असलेला साहित्याचा फरहान हा शून्यावर बाद झाला तर सॅम अयुब हा सहा धावा केल्या आणि त्याला जसप्रीत बुमराह याने त्याला बाहेरचा रस्ता दाखवला. पाकिस्तानचा कर्णधार सलमान मध्ये चार धावा केल्या आणि जसप्रीत बुमराह त्याच्या पहिल्याच ओव्हर मध्ये दोन विकेट्स घेऊन भारताला विजयाच्या दिशेने अग्रेसर केले.

पाकिस्तानच्या संघासाठी संघाचा फलंदाज उस्मान याने ४४ धावांची खेळी खेळली पण तो पाकिस्तान विजयपर्यंत नेण्यात अपयशी ठरला. उस्मान खान आणि शादब खान यांची चांगली भागीदारी झाली होती पण अक्षर पटेल याने भारताला पाचवा विकेट मिळवून दिला. शादाब खान याने १४ धावा केल्या आणि तिलक वर्मा याने त्याला पव्हेलियनचा रस्ता दाखवला. पाकिस्तानच्या संघाची या सामन्यामध्ये खराब फलंदाजी पाहायला मिळाली. भारतीय संघाच्या गोलंदाजी बद्दल सांगायचं झाले तर हार्दिक पांड्याने भारताच्या संघाला एक विकेट मिळवून दिला त्यांनी त्याच्या पहिल्याच ओव्हर मध्ये विकेट घेतला तर जसप्रीत बुमराह याने भारताच्या संघाला त्याच्या पहिल्याच ओव्हर मध्ये दोन विकेट्स मिळवून दिले अक्षर पटेलने देखील त्याच्या स्पेलमध्ये दोन विकेट्स मिळवून दिले.

# भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियाला हरवले

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



भारतीय महिला क्रिकेट संघाने १५ फेब्रुवारी २०२६ रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात डकवर्थ-लुईस नियमानुसार २१ धावांनी विजय मिळवला. सिडनी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात पावसामुळे खेळ थांबवण्यात आला, तेव्हा भारताने लक्ष्याचा पाठलाग करताना ५.१ षटकांत १ गडी गमावून ५० धावा केल्या होत्या. त्यावेळी नुसार भारताला विजयासाठी २९ धावांपर्यंत पोहोचणे आवश्यक होते. भारतीय संघ या पार स्कोअरपेक्षा २१ धावांनी पुढे होता. त्यामुळे नियमानुसार भारताला २१ धावांनी विजयी घोषित करण्यात आले.

अरुंधती रेड्डीने कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी करत २२ धावांत ४ बळी घेतले, तर रेणुका सिंगनेही उत्कृष्ट गोलंदाजी केली. दोघांच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे भारताने ऑस्ट्रेलियाला १३३ धावांत गुंडाळले. लक्ष्याचा पाठलाग करताना शेफाली वर्मा, स्मृती मंधाना आणि जेमिमा रॉड्रिग्स यांनी वेगवान फलंदाजी केली आणि पाऊस येण्यापूर्वीच संघाला विजयाच्या मजबूत स्थितीत आणले. या विजयासह भारतीय संघ आता ऑस्ट्रेलियामध्ये आपली दुसरी द्विपक्षीय टी-२० मालिका जिंकण्यापासून फक्त एक पाऊल दूर आहे. रेणुका सिंगचे पॉवरप्लेमध्ये वर्चस्व, ऑस्ट्रेलियाला सुरुवातीला रोखले. सामन्याच्या सुरुवातीला रेणुका सिंगने तिच्या स्विंगने ऑस्ट्रेलियन फलंदाजांना खूप त्रास दिला. तिने पॉवरप्लेमध्ये सलग तीन षटके टाकली.

## भारत जागतिक क्रिकेटचा नवा 'राजा'

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतीय संघाचा अश्वमेध घोडा वेगाने दौडत सुटला आहे. टी-२० वर्ल्ड कप २०२६ च्या २७ व्या सामन्यात भारताने पाकिस्तानला धूळ चारत एक मोठा विश्वविक्रम रचला. भारताने आयसीसी स्पर्धेत सलग १६ सामने जिंकण्याचा पराक्रम केला आहे. अशी कामगिरी करणारा भारत हा जगातील पहिला संघ ठरला आहे. यापूर्वी हा मुकूट ऑस्ट्रेलियाच्या अर्थात कांगारूंच्या माथ्यावर होता. तो आता भारताच्या डोक्यावर झळकणार आहे.

# क्रिकेट सामन्यात जय हनुमान आंबेवाडीची बाजी

| कोलाड | प्रतिनिधी |

गोवे-कोलाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने पर्व ८ च्या श्री सोमजाई प्रसन्न गोवे यांच्या वतीने क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले.या क्रिकेटच्या अंतिम सामना जय हनुमान आंबेवाडी संघ अंतिम विजेता संघ ठरला.



या क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन ज्येष्ठ कार्यकर्ते तानाजी जाधव, गोवे ग्रामपंचायत सदस्य नितीन जाधव, नरेंद्र पवार, गोवे गाव कमेटी अध्यक्ष बळीराम जाधव, युवा कार्यकर्ते राकेश कापसे, लहू पिंपळकर, लिलाधर दहिंबेकर, कमलाकर शिर्के, भरत जाधव, पांडुरंग जाधव, महेंद्र जाधव, नितीन जवके, पोलीस पाटील सुरेश जाधव, रामचंद्र कापसे, सचिन शिंदे, नंदा वाफिळकर, निलेश वाफिळकर, शांताराम घरट तसेच गोवे-कोलाड क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र जाधव सर्व सदस्य तसेच श्री.सोमजाई प्रसन्न गोवे यांचे पदाधिकारी व सर्व सदस्य यांच्या उपस्थित करण्यात आले.

या क्रिकेटच्या शेवटच्या चेंडू पर्यंत रंगलेल्या रोमहर्षक अटीतटीच्या अंतिम सामन्यात जय हनुमान आंबेवाडी संघाने श्री.सोमजाई तिसे संघावर विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. श्री.सोमजाई तिसे संघ द्वितीय, तर सोनारसिद्ध धाटाव संघ तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

मालिकावीर जय हनुमान आंबेवाडी संघाचा आशिष पांचाळ, उत्कृष्ट फलंदाज श्री सोमजाई तिसे संघाचा प्रज्योत जाधव, उत्कृष्ट गोलंदाज सोनार सिद्ध धाटाव संघाचा मंदार साबळे यांना देण्यात आले. सर्व विजेत्या संघाना आकर्षित चषक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.सर्व क्रिकेट सामने यशस्वी करण्यासाठी श्री. सोमजाई प्रसन्न संघाचे पदाधिकारी व सदस्यांनी मेहनत घेतली.

# माणगावच्या शिपुरकर अन् शिंदे शाळेची सुवर्णभरारी

## रुद्र आणि आयानची राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत उज्वल यश

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगावच्या मातीतून घडलेले दोन चिमुकले खेळाडू राष्ट्रीय पातळीवर झळकले आणि संपूर्ण तालुक्याचे नाव अभिमानाने उंचावले. बारामती येथे पार पडलेल्या खुल्या राष्ट्रीय तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या दोन्ही शाळांतील विद्यार्थ्यांनी कष्ट, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर सुवर्ण आणि कांस्य पदकांची ऐतिहासिक कमाई केली.



गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मीडियम स्कूल, माणगाव येथील इयत्ता नववीतील मास्टर रुद्र दर्शना बेबिन नायर याने ज्युनियर ५० किलो वजन गटात अप्रतिम खेळ सादर करत सुवर्णपदक पटकावले. अंतिम फेरीत त्याने दाखवलेली चपळाई, अचूक किक्स आणि आत्मविश्वास पाहून प्रेक्षकही थक्क झाले. प्रत्येक सामन्यानंतर त्याच्या डोळ्यांत दिसणारी जिद्द आणि विजयाच्या क्षणी उमटलेले समाधानाचे हास्य हा क्षण माणगावसाठी अभिमानाचा ठरला.

मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई स्कूल, माणगाव येथील इयत्ता सहावीतील आयान मोहम्मद अली लोखंडे याने सब-ज्युनियर ३० किलो वजन गटात दमदार लढत देत कांस्यपदक मिळविले. वय लहान असले तरी त्याच्या खेळातली परिपक्वता आणि धैर्य लक्षणीय होते. प्रत्येक फेरीत त्याने हार न मानता शेवटपर्यंत झुंज दिली आणि अखेर पदकावर आपले नाव कोरले. आयानच्या या कामगिरीने माणगावातील लहान मुलांनाही मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा दिली आहे.या दोन्ही खेळाडूंना तायक्वांदो प्रशिक्षक प्रतिक गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# टेनिस क्रिकेट स्पर्धेचा समारोप



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथे श्री चिंचबादेवी क्रिकेट क्लब आयोजित टेनिस क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. ग्रामीण भागातील क्रीडाप्रेमींसाठी ही स्पर्धा प्रतिष्ठेची मानली जात असून यंदाही स्पर्धेला खेळाडू आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

अंतिम सामन्यानंतर विजेत्या व उपविजेत्या संघांना चषक आणि पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंचे कौतुक करताना क्रीडाभाव जपण्याचे आवाहन केले. ग्रामीण पातळीवर अशा स्पर्धांमुळे नवोदित खेळाडूंना व्यासपीठ मिळते आणि त्यांच्यातील कौशल्याला चालना मिळते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या सोहळ्यात सुकुमार तोंडलेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक व सार्वजनिक कार्याची दखल घेत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. आपल्या मनोगतात त्यांनी क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी नेहमीच सहकार्य राहील, असे आश्वासन दिले.

कार्यक्रमास श्याम भोकरे, पंचायत समिती सदस्य सुकुमार तोंडलेकर, कुणाल पेडणेकर, गौरव तोंडलेकर, रफीक जहागीरदार, संदेश म्हसकर, सागर इंगळे, भाऊ साळुंखे, यश पाटील यांच्यासह अनेक मान्यवर, माजी खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्पर्धेचे नियोजन, मैदानाची व्यवस्था, पंचांची कामगिरी आणि शिस्तबद्ध आयोजन याबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. ४० वर्षांची परंपरा असणाऱ्या स्पर्धेने पुन्हा एकदा क्रीडाप्रेमींच्या मनात आपले वेगळे स्थान अधोरेखित केले आहे.

ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# सुकेळी क्रिकेट स्पर्धेत केळजाई केंळद संघ विजेता

| सुकेळी | प्रतिनिधी |

सुकेळी येथील जय गावदेवी क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अनेक संघांनी सहभाग दर्शवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



या संपूर्ण स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी संघ ठरला तो केळकाई कळंब या संघास रोख रक्कम रु.२५,००० व आकर्षक चषकासह गौरविण्यात आले.


उपविजेत्या ठरलेल्या कासारवाडी या संघाला संघाला १२,००० व आकर्षक देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे तृतीय क्रमांक गणपतवाडी, चतुर्थ क्रमांक उसर ठाकुरवाडी, पाचवा क्रमांक वाडा तसेच सहावा क्रमांक मुकडे या संघाना सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेला मनोज खांडेकर, विनोद निरगुडे, संजय कणघरे, यशवंत पवार यांच्यासह ग्रामस्थ यशवंत वारगुडे, मालु शिद, जानु शिद, चंदु वारगुडे, अक्षय निरगुडे, प्रभाकर वारगुडे तसेच सर्व गणपतवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

# रशीद खानचा वर्ल्ड रेकॉर्ड

| कोलंबो | वृत्तसंस्था |

टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये आज १६ फेब्रुवारीला पहिला सामना अफगाणिस्तान व युएई यांच्यात खेळवला जात आहे. या सामन्यात अफगाणिस्तानच्या संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. दरम्यान पहिल्या डावात खेळत असताना संघाचा कर्णधार रशीद खानने एक विकेट घेताच टी-२० इतिहासात विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे. अफगाणिस्तान संघाने टी-२० विश्वचषकातील सर्व सामान्यामध्ये कडवी झुंज दिली आहे.



२५ देशांतील २५० स्पर्धकांचा सहभाग | युरोपची मक्तेदारी मोडीत

# पाचगणीत रंगणार पॅराग्लायडिंगचा थरार

| पाचगणी | वृत्तसंस्था |

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या निसर्गरम्य पाचगणीच्या आकाशात आजपासून जागतिक स्तरावरील साहसी खेळांचा महाकुंभ सुरू झाला आहे. महाराष्ट्र शासनाचे पर्यटन संचालनालय आणि हाय फ्लाय पॅराग्लायडिंग यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित पॅराग्लायडिंग वर्ल्डकप उत्साहात उद्घाटन झाले.

आतापर्यंत प्रामुख्याने युरोपीय देशांची मक्तेदारी असलेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे यजमानपद यंदा प्रथमच भारताला आणि त्यातही आपल्या पाचगणी शहराला मिळाल्याने साताऱ्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. खासदार नितीन पाटील यांच्या हस्ते या भव्य स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी पाटील म्हणाले, या स्पर्धेच्या निमित्ताने पाचगणीची ओळख केवळ एक पर्यटन स्थळ म्हणून मर्यादित न राहता जागतिक स्तरावरील पॅराग्लायडिंग हब म्हणून निर्माण होणार आहे. साताऱ्याच्या डोंगरदऱ्यांतील निसर्गाचे वरदान आता जागतिक साहसी पर्यटनाच्या नकाशावर ठळकपणे चमकणार आहे. या स्पर्धेसाठी जगातील सुमारे २५ देशांतील २०० नामांकित धाडसी स्पर्धक पाचगणीत दाखल झाले असून, १५ ते २१ फेब्रुवारी या कालावधीत आकाशात रंगीबेरंगी पॅराग्लायडर्सची मांदियाळी पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेच्या पारदर्शक परीक्षणासाठी पॅराग्लायडिंग वर्ल्डकप असोसिएशनचे अध्यक्ष गोरान यांच्यासह जागतिक तज्ज्ञ पंच आणि तांत्रिक समिती उपस्थित आहे.

जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्र राजपुरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना, अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमुळे स्थानिक पर्यटनाला मोठी चालना मिळेल आणि स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. पाचगणीकर आणि पर्यटकांनी या जागतिक थराराचा अनुभव घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी नगरपालिकेचे अध्यक्ष दिलीप बगाडे, उपनगराध्यक्ष प्रकाश गोळे, दांडेघरच्या सरपंच सृष्टी खरात, माजी सरपंच शंकर कळंबे, नगरसेवक परवीन मेमन, नारायण बिरामणे, प्रकाश गोळे, सुप्रिया माने यांच्यासह वर्ल्ड कप असोसिएशनच्या टेक्निकल टीममधील कृष्णकांत भागरा, दोहरा आदी मान्यवर उपस्थित होते. हाय फ्लाय पॅराग्लायडिंगचे अध्यक्ष अनुपम जाधव पाटील यांनी प्रास्ताविक केले. २१ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेमुळे पाचगणी परिसरात उत्साहाचे वातावरण आहे.

आजवर केवळ युरोपीय देशांतच रंगणारा हा जागतिक थरार पाचगणीच्या टेबल लँड आणि दांडेघरच्या डोंगररांगांमध्ये अनुभवता येणार आहे. ही स्पर्धा केवळ खेळ नसून पाचगणीच्या अर्थव्यवस्थेला आणि पर्यटनाला जागतिक भरारी देणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. त्यामुळे युरोपची मक्तेदारी मोडीत निघणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)